# मालकीची मीमांसा

९८५५.
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७३०५

अनुवादक
**वामन जनार्दन कुंटे**

REFBK-0008513

किंमत ४ आणे.

# मालकीची मीमांसा

'**मालकीची मीमांसा**' उत्तम च पुस्तक आहे. आमच्या सोबत्यांना तें वाचण्याची मीं शिफारस केली आहे. दुर्बळ शरीर असून तुम्ही सहानुभूतीनें जें करीत आहां त्याचें मला फार मोल वाटतें.

ता. ५-१२-५५ **विनोबा**

अनुवादक

**वामन जनार्दन कुंटे**

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.**
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........
REFBK-0008513

२ ऑक्टोबर १९५५.

प्रकाशक :-
**वामन जनार्दन कुंटे**
कुंटे वाडा, सांगली.

मुद्रक:-
**श्री. शा. नी. देशपांडे**
M. A., B. SC.
मॅनेजर-श्रीगणपति संस्थान
प्रेस, सांगली.

# प्रस्तावना.

कुळकायदा आणि भू-दान-यज्ञ या विषयांवर वाद चालला होता. त्यांत एक गृहस्थ म्हणाले 'कसेल त्याची जमीन असें तुम्ही आज म्हणतां. उद्या राहील त्याचें घर म्हणूं लागाल.' माझ्या ओठावर 'होय' असें उत्तर आलें होतें पण आगींत तेल पडायचें म्हणून मी तोंड आवरलें. शिवाय जमीन परमेश्वराची देणगी आहे. घर तसें नाहीं, मनुष्यकृत आहे हाहि विचार मनांत उद्‌भवला. गवंडी, सुतार, मजूर घर बांधतात पण ते त्याचे मालक असत नाहींत. तिसराच एकादा माणूस त्याचा मालक बनतो. कारण घर कसें बांधायचें वगैरे तो आपल्या सोईप्रमाणें ठरवितो. त्याला लागणारा खर्च करतो व नंतर त्यांत राहतो. यामुळें त्याचा त्या घराशी घनिष्ठ संबंध निर्माण होतो. गवंडी, सुतार हे केवळ सांगकामे असतात. घर बनविणें यापेक्षां त्यांत राहणें हें मालकीचे प्रमुख लक्षण असेल काय ? आमच्या आजोळची माणसें एका भाड्याच्या घरांत अनेक वर्षें रहात होतीं. तो वाडा त्यांचाच असें लोक समजत. पुढे त्यांनी स्वतःचें नवीन घर बांधले व तिकडे ते रहावयास गेले तरी तें घर त्यांचेच जुने घर म्हणून पुढे अनेक दिवस संबोधलें जात होते. म्हणजे लोकमतानें त्यांना त्या घराची मालकी देऊन टाकली होती. तशीच शेताचीहि गोष्ट आहे. येथील माधवनगर स्टेशनच्या जुन्या वाटेवर मिरजेच्या

एका इनामदारांचा मळा होता. त्याचा वाटेकरी आप्पा माळी म्हणून अनेक वर्षें होता. त्यामुळें त्या मळ्याला 'आप्पा माळ्याचा मळा' असेंच म्हणत.

ज्याने स्वतःच्या पैशानें जमीन खरेदी केली त्याची गोष्ट थोडा वेळ बाजूस ठेवूं; पण ज्याना वडिलार्जित जमीन मिळाली त्यांचा त्या जमीनीशी संबंध कसा असतो तें आपण पाहूं. तो कुठें तरी दूर देशी कामावर असेल, जमीन कोठें आहे हें हि त्याला माहित नसेल पण प्रचलित कायदा त्या जमिनीची मालकी त्याला बहाल करितो. बाप आपली जिंदगी आपल्या मुलाबाळाकरितांच संभाळत असतो तेव्हां ती त्याच्या मुलांना मिळणे योग्य अशी प्रचलित समजूत आहे. व त्यावरच कायदा आधारलेला आहे. पण एकाच आईबापांची दोन मुलें. एक मुलगा आणि मुलगी. कायदा फक्त मुलाला जमीन देतो मुलीला नाहीं. आतां मुलीलाहि हिस्सा मिळावा असा कायदा होत आहे. हा सध्याच्या मालकीच्या कल्पनेंत बदल झाल्याचा परिणाम. तसाच या दोघापैकी कोणालाहि मिळूं नये असाहि कायदा होऊं शकतो. ज्याना मालकी केवळ कायद्यामुळेंच मिळाली त्यांची कायद्यामुळेंच मालकी गेली तर वस्तुतः दुःख वाटण्याचें वा आपल्यावर अन्याय झाला असें मानण्याचें कारण नाहीं. असो !

पण मालकीचा प्रश्न एकंदरींत बराच अवघड जटिल आहे खराच. अर्थशास्त्रावरच्या पुस्तकांत त्याचें उत्तर मिळावें. श्री. कुमाराप्पांचें अर्थशास्त्रावरचे लेख मी समजूं शकतो म्हणून अर्थशास्त्र सोपें असावे तें आपल्याला कळायला अडचण पडणार

नाहीं अशा समजुतीनें अर्थशास्त्रावरील प्राथमिक पुस्तक वाचण्याचा मी प्रयत्न केला. पण, तें मात्र अगम्य आहे असे मला आढळून आलें व तें अधिक वाचण्याचा नाद सोडून दिला. म्हणून मालकीच्या प्रश्नावर माझ्या मनांत जो गोंधळ होता तो तसाच राहिला. पण एडवर्ड कार्पेंटर यांचें एक निबंधाचें पुस्तक माझ्या वाचनांत आले. त्यांत 'प्रॉपर्टी'वरचा एक निबंध आहे. निबंध लहानच आहे पण मालकी संबंधी सांगोपांग चर्चा त्यांत केलेली आहे मालकी कशी उत्पन्न होते, तिच्या मर्यादा काय, ऐतिहासिक कालापासून मालकीच्या कल्पना कशा बदलत गेल्या वगैरे संबंधी सुंदर वर्णन त्यांत आहे.

एडवर्ड कार्पेंटर हा एक मोठा प्रयोगी विचारक इंग्लंडमधें होऊन गेला. महात्मा गांधीजींच्या जीवनावर थोरो रस्किन वगैरे ज्या लेखकांचा परिणाम झाल्याचें प्रसिद्ध आहे, त्यांतच कार्पेंटर यांचीहि गणना आहे. महात्माजींच्या Indian Home Rule या प्रसिद्ध पुस्तकाच्या संदर्भ ग्रंथांत, कार्पेंटरच्या 'Civilization' Its Cause & Cure' म्हणजे 'संस्कृति, तिचे निदान आणि चिकित्सा' या पुस्तकाचा उल्लेख आहे. संस्कृति अर्थात् पाश्चात्य संस्कृति त्याच्या नजरे समोर वाहे. तिला एक प्रकारचा रोग समजतो तो कशामुळे जडतो साची कारणें व त्यावर उपाय त्यानें दाखविले आहेत. हें पुस्तक मात्र खटपट करूनहि मिळू शकलें नाहीं.

पुस्तकांत दुसरा निबंध 'परवडते काय? ' हा आहे. सध्या कोणता उद्योग चांगला आहे कीं वाईट हे मोजण्याचें साधन त्या उद्योगांतून पैसा किती मिळतो हेंच केवळ झालें आहे. सुरवातीस पैसा हे देवघेवीचे सुलभ साधन म्हणून उत्पन्न झाला. पण त्याची

प्रतिष्ठा वाढत वाढत तो आज सार्वभौम झाला आहे. प्रत्येक गोष्ट अशा तऱ्हेने पैशाच्या कसावर तपासणें किती अयोग्य आहे, हें या निबंधांत कार्पेंटर यानीं दाखविलें आहे. निबंधाची जास्त ओळख यापेक्षा जास्त करण्याचें येथें कारण नाहीं.

या पुस्तिकेतले विचार पू. विनोबांच्या भू-दान-यज्ञाला आणि कांचनमुक्तीच्या कल्पनेला पोषक असे आहेत. भू-दान-यज्ञाची कल्पना, ज्याना राजगोपालाचारिअर यांच्यासारख्या श्रेष्ठ पुरुषानीं 'अवतारी पुरुष' म्हटलें अशा पू. विनोबांच्या दिव्य प्रतिभेतून स्फुरली आहे. त्या यज्ञाला या आधाराची फारशी आवश्यकता आहे असें नाहीं. पण आम्हां इंग्रजी शिक्षितांवर पाश्चात्य शिक्षणाचा अजूनहि बराच पगडा आहे. त्यांना येथली एखादी गोष्ट चांगली आहे असें ठरायला पाश्चात्यांचे शिफारस पत्र लागते. अशांचा भ्रमनिरास व्हायला या पुस्तिकेचा थोडा तरी उपयोग होईल, अशी मला आशा आहे.

कुंटे यांचा वाडा, **सांगली.**
११ सप्टेंबर, १९५५

**वामन जनार्दन कुंटे**

# मालकीची मीमांसा.

(मालमत्तेकरितांच केवळ कायद्याचा जन्म झाला आहे.—मेकॉले)

दा. क्र. ८९१३

## १. प्रास्ताविक

एकादा मोठा जमीनदार आहे. त्याच्या मालकीची हजारो एकर जमीन आहे अशा माणसाला आपली जमीन कोणती हें दाखवून देतां येईल काय? अर्थात् नाहीं. मग तो या जमीनीचा मालक आहे असें म्हणण्यांत अर्थ काय? असा कोणी प्रश्न विचारूं शकेल.

एकादी वस्तू आपल्या मालकीची असेल तर ती आपल्याला 'आपली' म्हणून माहीत असली पाहिजे. आणि ती आपल्याला ओळखतां आली पाहिजे. धनगराजवळ शेंकडो शेळ्यामेंढयांचा कळप असतो. त्यांतली आपली मेंढी तो अचूक ओळखून काढू शकतो म्हणूनच त्याची त्या मेंढ्यांवर मालकी टिकूं शकते. नाहींतर मेंढ्या तर दिसायला एक सारख्याच त्यांतली आपली मेंढी जर त्याला ओळखतां आली नांहीं तर थोड्याच दिवसांत त्याचा कळप खलास होऊन जाईल. रस्त्यांत एकादा शेजारी भेटला. तो आपल्याला ओळखतां आला तरच त्याला 'आपला' शेजारी असें म्हणतां येईल. केवळ आपल्या घराचेजवळ तो कोठें तरी राहतो एवढ्यावर त्याला शेजारी म्हणतां यायचें नाहीं. पण मोठ्या जमीनदारांच्या नोकरांना, वाटेकऱ्यांना, एवढेंच काय पण त्याच्या शेजारच्या शेतकऱ्यांनाहि त्याच्या स्वत:पेक्षा त्याच्या जमीनीची अधिक माहिती असते.

या दृष्टीनें पाहतां फारच थोड्या लोकांना जमीनीचे खरे मालक म्हणून म्हणतां येईल. कायदेशीररीत्या जो मालक आहे त्याला कागदपत्रावरून त्याच्या जमीनीच्या चतु:सीमा माहीत असतील पण जमीनीची खरी माहिती त्याला क्वचित असते. जमीन कोणत्या प्रकारची आहे; कोणतीं पिकें त्यांत चांगली येतील; तेथें कसली व किती झाडें आहेत, खडक किती खोलीवर आहे. पाणी लागेल कीं नाहीं वगैरे माहिती त्याला पाहिजे असेल तर, त्या जमीनीवर काम करणाऱ्या वाटेकऱ्याकडून मिळू शकेल. त्याच्या शेतांतून पाटीभर माती आणून त्याला दाखविली तर आपली म्हणून ओळखणें त्याला शक्य नाहीं; आणि चुकून त्याच्या हाताला लागलीच तर तो ती झटकून टाकून पाण्यानें हात धुवून टाकील. अशा तऱ्हेने आपला तिचा कांहीं संबंध नाहीं हें प्रत्यक्ष सिद्ध करून देईल. पण त्या जमीनीवर राबणारे त्याचे वाटेकरी मात्र तिच्याबद्दल रात्रंदिवस विचार करत असतील. जमीन सुधारायला कशी मेहनत करायची; कोणतें पीक यंदा काढायचें, कोणतें व किती खत घालायचें वगैरे विचार त्यांच्या मनांत येत असतील. एखादी जमीन न पेरतां मोकळी पडली, तेथें कोणी मेहनत न केल्यामुळें तण वाढून ती निकामी झाली तर, त्या जमीनीशी ज्यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नसला, ती बिघडून गेल्यामुळें त्याचें कांहीं नफा-नुकसान होणार नसलें तरी अशीं बेकार पडलेली जमीन पाहून शेतकऱ्याला बरें वाटत नाहीं. रानांत राबणाऱ्या शेतकऱ्यांचें जमीनीवर असें प्रेम असते. आणि जमीनीच्या कायदेशीर मालकाचे मनांत बहुधा एकच विचार असतो तो म्हणजे तिच्यांतून आपल्याला पैसा किती

मिळेल एवढाच. दुसरा असत नाहीं. जुन्याकाळीं जमीनदारांची जमिनीशी इतकी फारकत झालेली नव्हती.

मग प्रश्न असा कीं जमीनीचा खरा मालक कोण ? जो तिच्यावर प्रेम करितो, तिची सेवा करितो, तिच्यावर राबतो, तिला सुधारतो आणि सुंदर पीक काढून तिला प्रसन्नता आणतो तो तिचा मालक ? कीं ज्याला ती जमीन कोणती हेंहि माहीत असत नाहीं, जो तिची कांहीं सेवा करणार नाहीं, वृक्षवेलीनीं, प्रफुल्लित करण्याकरितां कांहीं मेहनत मशागत करणार नाहीं तिच्यातून किती व कसा ज्यास्त पैसा मिळेल एवढाच ज्याचा विचार, ज्यास्तींत ज्यास्त किती फाळा उकळतां येईल एवढीच ज्याला चिंता, बरी किंमत येत असेल तर जो तिला फुंकून टाकायला कमी करणार नाहीं, तो तिचा मालक ?

## २. मालकींचें खरें स्वरूप

आणि कायदेशीर मालकीचें खरें स्वरूप तरी काय ? जमीनीचे बाबतींत कुळाला जमीनीवरून काढून टाकण्याच्चा हक्क. शेतकरी जर त्याच्या परवानगीशिवाय कसूं लागला तर अतिक्रमणाकरितां न्यायालयांत खेचण्याचा आणि वाटेकऱ्याकडून फाळा वसूल करण्याचा अधिकार हें जमीनीच्या मालकीचें रूप. हा एक प्रकारें निषेधात्मक हक्क आहे. म्हणजे ती जमीन दुसऱ्यांना उपयोगांत आणण्यापासून प्रतिबंध करण्याचा त्याला हक्क आहे. त्या जमीनीवर राहणाऱ्या रहिवाशांना हुसकून शिकारीकरितां हरणांचे जंगल बनवण्याचा किंवा कोणी तिची मेहनत मशागत करून तिला उपयुक्त करीत असेल तर त्याला तसें करूं न देण्याचा

अधिकार म्हणजे मालकी. इंग्लंडांत थोड्याच लोकांच्या हातांत पुष्कळ जमीन आहे. हे जमीनदार या मालकी हक्काने इंग्रजी जनतेला उपास पाडून इंग्लंड सोडून जावयास भाग पाडूं शकतील. जो कायदेशीर मालक नाहीं त्याला आपल्यापुरतें अन्नधान्य उत्पन्न करण्यांकरितां जमीनीवर राबायचें असेल तर प्रथम त्यानें मालकाला फाळ्यांचे पैसे मोजले पाहिजेत. इतर मालमत्तेच्या मालकीचें स्वरूपहि असें निषेधात्मक आहे. मालकी म्हणजे वस्तू दुसऱ्यानां वापरूं न देण्याचा हक्क. ती स्वत: वापरण्याचा अधिकार एवढेंच मालकीचें रूप नाहीं. हें नीट लक्षांत घेतलें पाहिजे. एकाद्या माणसाजवळ दुर्बीण आहे. त्याला ती वापरतां येत नाहीं. तिचा उपयोग काय हें हि त्याला माहीत नाहीं, पण ज्याला ती वापरण्याचें ज्ञान आहे; तिच्यांतून पाहण्याची आवश्यकता आहे तरी देखील, आपली मालकी आहे म्हणून तो या दुसऱ्या माणसाला वापरण्याची बंदी करूं शकतो. त्याप्रमाणेंच एखाद्याच्या मालकीची उत्तम पिकावू जमीन आहे, त्याला शेतकी करण्याचें ज्ञान नाहीं; स्वत:ला कुदळहि उचलतां येत नाहीं, निदान मजूर लावून त्यांच्याकडून काम करून घेण्याची अक्कल वा त्याला लागणारा पैसा नाहीं; अशा परिस्थितींत ती कसायला लागणारी साधनें किंवा ती सक्तीनें कसून घेण्याची सत्ता कायदा कांहीं त्याला देत नाहीं. मात्र दुसरा कोणी कसूं इच्छित असेल त्याला बंदी करण्याचा जरूर तर पोलीसांची मदत घेऊन त्यांना प्रतिबंध करण्याचा अधिकार मात्र कायदा त्याला देतो. आणि त्या जमीनीवर झाडे-झुडपे वा इतर नैसर्गिक जी साधन संपत्ती आहे तीहि आपल्या स्वत:करितां राखून ठेवण्याचा हक्क कायदा त्याला देतो. याचें नांव मालकी.

## ३. कायद्याचे महत्व

कायदा व कायदेशीर हक्क यांचें कित्येकांना फार महत्व वाटते, आणि एक प्रकारे तें आहे हि यांत शंका नाहीं. संस्कृतीच्या एका विशिष्ट स्थितीमधे अशा प्रकारच्या हक्कांचा कांहीं उपयोगहि आहे खरा. पण त्याबरोबरच असा हक्क मूलतः प्रतिबंधात्मक, समाजविरोधी, एवढेंच नाहीं तर केवळ कायद्याच्या जोरावर मिळणारी मालकी ही हानिकारक आहे, हें हि लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण ती एक महान शक्ति आहे आणि सर्व महाशक्तीप्रमाणें जर ती मानवी हिताकडे लावली गेली नाहीं तर तिचे विनाशाकडे अधःपतन होऊं लागते. ज्याच्या जवळ अफाट पैसा आहे तो माणूस बंधाऱ्याची दारे उघडून पाणी सोडण्याची चावी ज्याच्याजवळ असते तशा मनुष्या-सारखा आहे. तो त्याच्या मर्जीप्रमाणें कोणीकडेहि पाण्याचा प्रवाह सोडूं शकतो. भलतें दार उघडून सुपीक जमीन पुरानें बेचिराख करून टाकू शकेंल किंवा योग्य कालव्यांत सोडून त्या कालव्याच्या पाण्यानें सुखसमृद्धि करूं शकेल. तो जीवनांत सुखशांति सुव्यवस्था निर्माण करूं शकेल किंवा हजारों लोकांच्या नाशाला आणि मृत्यूला कारणीभूत होऊं शकेल. पण उन्नतीपेक्षां अधःपतनाचा मार्ग सोपा असतो. ज्याच्या हातांत पैसा आहे त्याचा त्याने त्याला वाटेल तसा निष्काळजीपणानें उपयोग करणें कायदेशीर असेल पण निष्काळजीपणें व केवळ स्वार्थाकडे लक्ष देऊन केलेल्या खर्चामुळें त्यांतून विनाश आणि दुःखच निर्माण होण्याचा संभव अधिक म्हणून पैसा खर्च

करितांना त्याचा सदुपयोग होऊन त्यांतून समाजात सुख शांती उत्पन्न होईल की नाहीं याबद्दल बारकाईनें विचार करणें जरूर आहे.

## ४. संपत्तीची खरी व्याख्या

'सज्जनांच्या हातीं द्रव्य असेल त्यालाच संपत्ति म्हणावें' अशी रस्किननें संपत्तीची व्याख्या केली आहे. तिचा सत्यपणा वरील उदाहरणावरून लक्षांत येईल. योग्य प्रकारें कशी वापरायची हें ज्याला ज्ञान आहे आणि त्याच प्रमाणें वापरण्याची ज्या सज्जनाची दृढ बुद्धि आहे अशा माणसाच्या हातांत साधन संपत्ति, मालमत्ता असेल तिलाच मात्र संपत्ति म्हणतां येईल. याच्या उलट तऱ्हेच्या माणसाच्या हातांत ती असेल तर तिला संपत्ति न म्हणतां विपत्ति म्हणावे लागेल. एकाद्या जमीनदाराच्या मालकीची हजारो एकर जमीन आहे. तिची त्याला कांहीं खातर नाहीं कशी वापरावी याचा विचारहि ज्याच्या मनांत येत नाहीं; किंबहुना ती खरी उपयोगांतहि आणली जात नाहीं आणि तिच्याकडे लक्ष न दिल्यामुळें ठिकठिकाणी पाणी साठून डबकी झालीं आहेत म्हणून हिवतापाचें डांस वाढविण्याचें काम जी करीत आहे, जिच्यावर कांहीं पीक येते, ती कुळाना लावून टाकून गरीब कुळांचे शोषण करून त्याच्याकडून निघेल तितका पैसा त्यांच्या परिस्थितीकडे न पाहतां उकळण्याचें काम निष्ठुर दिवाणजीकडे सोपविल्यामुळें शेतकी मोडकळीस येऊन शेतकऱ्यांत दारिद्र्य रोग, असंतोष माजला तरी त्यांच्याकडे पहाण्याचे सोडून जे शहरांत राहून चैन, विलासांत दंग आहेत. असल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम.
अनुक्रम ३८१९४८ वि: ...... ११
क्रमांक ७३०५ नों: दि: ५-५-७५

जमिनी किंवा काटेकोरपणें बोलायचें म्हणजे अशा जमिनीवरील जमीनदारांची खासगी मालकी—कारण जमिनी स्वतः म्हटल्या तर परमेश्वराची देणगी आहे. – ही देशाची संपदा म्हणण्याऐवजी विपदाच म्हणावी लागेल. मसाल्याचे तळकट महाग पदार्थ नेहमी खाल्ल्यामुळें साध्या सुग्रास पदार्थांची चवहि समजत नाहीशी व्हावी. दारांत नेहमी मोटार घोडागाडी नेण्यास उभी असल्यामुळें थोडेसेंहि चालणें मुष्कीलीचें व्हावे. फर्नीचर आणि इतर सामानानें खोली भरून गेल्यामुळे मोकळी स्वच्छ हवाहि मिळूं नये व यामुळें रोग आणि मृत्यूला सहज बळीं पडावे अशी स्थिती ज्यामुळें होईल त्या पैशाला संपत्ति म्हणावे कीं विपत्ति ? ही विपत्ति पैसेवाल्यापुरतीच मर्यादित रहात नाहीं. या सर्व वस्तू ज्यांच्या श्रमाने उत्पन्न होत असतात त्यांनाहि बहुधा त्यांचा प्रसाद मिळतोच. हाच पैसा जर निरोगी वातावरणांत उपयुक्त उद्योगाला लावला तर अनेक प्रामाणिक श्रमिकाना काम मिळेल. तो मुक्तहस्तानें आणि प्रेमानें खर्च झाला तर मजुराना पोटभर अन्न व निरोगी जीवन लाभेल. त्यांचें केवळ पोट भरेल एवढेंच नाहीं, तर त्यांची अंतःकरणेंहि कृतज्ञतेनें भरून जातील. ज्यांना यामुळें प्रत्यक्ष मदत मिळते ते तर असे सुखी होतीलच पण दुसऱ्याहि अगणित लोकापर्यंत तें पोचेल. पहिल्या प्रकारें पैसा खर्च झाला तर ती एक व्यादच होईल. दुसऱ्या प्रकारें झाला तर कल्याणप्रद होईल. पहिला मार्ग सोपा असला तरी त्याला केवळ कायद्याची मान्यता मिळेल, दुसरा कष्टाचा असला तरी तो भूतदयेनें भरलेला असल्यामुळें कल्याणकारी होईल.

या प्रमाणें आपण ज्या विषयाचा विचार करीत आहों त्यासंबंधी पहिली पायरी म्हणून माझ्या मतें असें सर्वसाधारण विधान करणें युक्त होईल कीं, 'कायद्यानें प्रस्थापित केलेली मालकी प्रतिबंधात्मक आणि समाजविरोधी असते आणि तिला जर भूतदयेचा अंकुश किंवा मर्यादा नसेल तर ती अत्यंत हानिकारक होईल हे निश्चित. आणि कोणी माणूस आपल्या कृत्याचे समर्थन तें कायदेशीर आहे एवढेंच करूं लागला कीं खुशाल समजावें कीं कांहींतरी दुष्कृत्य करण्याचें त्याच्या मनांत असावें.

## ५. मालकीच्या स्वरूपाचा अधिक विचार

मालमत्तेचें खरें स्वरूप काय याचा आपण आतां थोडा विचार करूं. काय्रदेशीर मालकी ही अकरणरूप किंवा निषेधार्थी आहे, म्हणजे ती केवळ भासरूप आहे. कायदेशीर मालकी हा जिचा भास आहे, जिचें प्रतिनिधित्व ती करीत आहे अशी 'मालकी' या नांवाचीं सत्य वस्तू आहे काय ?

एखादा माणूस या व्यक्तीवर माझी सत्ता आहे, हे जनावर किंवा ही वस्तू आपल्या मालकीची आहे असें म्हणतो तेव्हां त्याचा अर्थ काय ? आपण पहिलीच गोष्ट घेऊं. एखादा गुलामाचा मालक कायद्याच्या आधारावर आपल्या इच्छेप्रमाणें काय वाटेल तें त्यांना करावयास भाग पाडील. पण दुसरा कोणी मालक असा आढळेल कीं तीच गोष्ट कायद्याच्या मदतीशिवाय आपल्या व्यक्तिमत्वानें, प्रेमानें किंवा कळकळीनें त्याच्या सुखदुःखाची चौकशी करून एकमेकांत असे चांगले संबंध प्रस्थापित करून घडवून आणू शकेल. अशा वेळी त्यांची मालकी अधिक परिपूर्ण

असेल. त्यांची आज्ञा अधिक मनःपूर्वक पाळली जाईल आणि प्रेमाचें बंधन कायद्याच्या बेडचापेक्षां अधिक बळकट असेल. या प्रकारची मालकी कायदेशीर मालकीपेक्षां अधिक सत्य आहे.

जनावरांची तशीच गोष्ट आहे. प्रेम, धैर्य आणि व्यक्तिमत्व यामुळें जनावरांचे प्रेम संपादन करिता येतें. कुत्रा ज्यानें त्याला विकत घेऊन कायदेशीर सत्ता त्याच्यावर मिळविली आहे त्याला सोडून देऊन खऱ्या मालकाकडे पळून जातो. ही दोन उदाहरणें पाहिली म्हणजे असें दिसून येईल कीं खरी मालकी म्हणजे विश्वस्तता किंवा साध्या शब्दांत म्हणायचे म्हणजे विश्वासस्थान. ज्या प्राण्यावर तुम्हाला सत्ता किंवा मालकी पाहिजे असेल त्याचे तुम्ही विश्वस्त झालें पाहिजे. केवळ आपल्या फायद्याकरिता गुलाम अथवा नोकर बाळगणें, किंवा त्याला कापून चट्टामट्टा करण्याकरितां जनावर बाळगणें ही मालकी खोटी आहे. अशा माणसाकडे किंवा जनावराकडे वर मान करून तुम्ही पाहूं शकणार नाहीं. कायद्यानें तुमची त्यांच्यावर मालकी असेल, पण या मालकीच्या संबंधांतून तुम्हाला समाधान लाभणार नाहीं; कटकटीच वाढतील.

ही जिवंत प्राण्याची गोष्ट झाली. अशावर जी सत्ता तुम्हांला पाहिजे असेल ती त्यांच्याशी योग्य संबंध ठेवूनच तुम्हाला प्राप्त करून घेता येईल. पण ज्या केवळ भौतिक, निर्जीव वस्तू आहेत, त्यावर तरी तुम्हाला आपली पूर्ण मालकी प्रस्थापित करितां येतें कां ? एखाद्या परमाणूचे तरी तुम्ही नियंत्रण किंवा त्याला आज्ञा करूं शकतां काय ? तुम्ही करू शकणार नाहीं

असें माझे म्हणणें नाहीं. उलटपक्षीं ज्या प्रयाणें जिवंत प्राण्यावर ज्या मार्गानें खरी सत्ता प्रस्थापित करितां येते तशीच जड वस्तूवर पण त्याच मार्गानें सत्ता चालवितां येईल असें माझें स्वप्न आहे. पण तसा अधिकार मिळविण्याचा सध्या विशेष कोणी अभ्यास करीत नाहीं. लहानशी कापराची वडी आहे, तिला चांगली कागदांत गुंडाळून टेबलाच्या खणांत ठेवून म्हणाल, 'तूं माझ्या मालकीची आहेस, तुला मी ठेवीन तेथें पडून राहिलें पाहिजें.' कांहीं दिवसानीं कागदाची घडी उघडून पहा तेथें वडीचा मागमूसहि नाहीं नुसता कागद उरलेला असेल. नाहीं म्हणायला कापराचा वास तेवढा कांहीं दिवस येईल. नाशिवंत न वाटणारे हिरे माणके मोती असलें जवाहीर तुम्ही पेटीत किंवा कपाटांत बंद करून ठेवले तरी त्याच्यावर कोणी चोर आणि गंज हल्ला चढवीत असतातच. या जवाहिराला तुम्ही म्हणाल 'हिऱ्यामाणकानों तुम्ही माझ्या मालकीची आहां.' होय, असें तुम्हाला म्हणतां येईल. पण त्याचा तरी अर्थ काय ? पेटी उघडून हात चोळीत त्यांच्याकडे पहात ह्यांच्यावर माझी सत्ता आहे ही दुसऱ्या कोणाला वापरूं देणार नाहीं, एवढ्याच कायदेशीर हक्कानें तुम्ही तीं आपलीं आहेत असें म्हणतां कीं यापेक्षां कांहीं उच्च अर्थ त्यांत आहे आणि असेल तर कोणता?

## ६. खरी मालकी

इंग्रजींत मालमत्तेला 'प्रॉपर्टी' म्हणतात. प्रॉपर्टी म्हणजें त्या वस्तूला जें (प्रॉपर) म्हणजे योग्य आहे तें म्हणजेच गुणधर्म. गंधकाच्या खड्याची (प्रॉपर्टी) कोणती म्हणजे

त्याचे गुणधर्म काय आहेत त्याचें वैशिष्टच काय आहे; त्याचा इतर वस्तूशी संबंध कोणता ? खडूची 'प्रॉपर्टी' म्हणजे गुणधर्म काय ? चक्क्याहून तो कसा वेगळा ओळखतां येईल ? वनस्पती जीवनाचे गुणधर्म काय? प्राणिजीवनाचे काय ? आणि मानवाचे गुणधर्म कोणते ?

हा शेवटचा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. या सर्व देखाव्या-मधे किंवा आभासामधे आपण ज्या वस्तूचा शोध करीत आहों ती या ठिकाणीं सापडेल काय ? भौतिक साधन संपत्ति मालमत्ता ही केवळ तिचे चिन्ह किंवा दिग्दर्शक असावी काय ? या भौतिक परिमित संपत्तिसाठी चाललेली धावाधाव. त्यांत उत्पन्न होणारे मोह व फसवणूक. केव्हां घोटाळ्यांत दलदलींत अडकून त्यांतून सुटण्याकरितां धडपड. उत्पन्न होणाऱ्या अनेक गुंतागुंती सोडविण्याकरितां चाललेल्या युक्त्या प्रयुक्त्या या सर्वांचा आम्ही विचार करीत आहो, त्या प्रश्नांचे समर्पक उत्तर मिळत असेल, त्या शाश्वत अपार संपत्तीचा शोघ लागत असेल तरच योग्य ठरतील.

कायदेशीर सत्तेपेक्षां अधिक सत्य अधिक खऱ्या अर्थानें भौतिक वस्तूवर तरी कांहीं सत्ता मालकी असू शकते काय, याचा आपण प्रथम थोडा विचार करूं आपण कल्पना करूं, एक माणूस भुकेला आहे, तेव्हां त्याला सुग्रास सुवासिक आंबेमोहोर तांदुळांचा मऊ मोकळा भात त्याच्या पानांत उन्हउन्हीत वाढून त्यावर लोणकढे तूप वरण वाढलें व तें त्यानें ज्या परमेश्वराच्या कृपेनें आपल्यास मिळाले त्याची कृतज्ञता मानून शांतपणें जेवून

जसजशी कामाची योग्यता वाढत जाईल, त्याला लागलेल्या श्रमाचें परिमाण वाढेल. जितकी जास्त कल्पकता लागलेली दिसून येईल किंवा जितकें जास्त कळकळीचें हस्तकौशल्य त्याला लागलें असेल त्याच प्रमाणांत त्या वस्तूची किंमत वाढत जाईल आणि इतक्या परिश्रमानें ज्या माणानें ती वस्तू बनविली असेल त्या माणसाचा मालकी हक्क जनता निःसंकोचपणें मान्य करील. काठीपेक्षा धनुष्य करायला अधिक श्रम पडतील, तर त्याची किंमतही जास्त होईल. सतारीची त्याहून जास्त होईल. जो सतार बनवतो ती तिजबद्दल मोबदला घेऊन विकून टाकीपर्यंत त्याच्याच मालकीची असते. त्यानें ती विकून टाकल्यावरहि त्याची कायदेशीर मालकी नष्ट झाली तरीं एकप्रकारे त्यानें आपला जीवच तींत ओतलेला असतो म्हणून अजूनहि ती सतार त्याचीच असते दुसऱ्याची होऊं शकत नाहीं. तिचा आवाज ती कोणी बनवली, ती कोणाची हें सांगितल्याशिवाय रहात नाहीं. Whitman आपल्या Leaves of grass या कवितेत म्हणतो, 'या कवितेला जो हात लावील त्यानें माझ्या काळजालाच हात घातला असें होईल.' जणू त्यानें स्वतःच त्या कवितेमध्यें प्रवेश केलेला असतो व त्याची ताटातूट कोणाला करितां येण्यासारखी नसते. उत्तम ग्रंथाच्या छापलेल्या प्रति अनेकानी खरेदी केल्या तरी त्या ग्रंथाचें कर्तृत्व त्या ग्रंथकर्त्यापासून कोणी हिरावून घेऊं शकत नाहीं. अनंतकाल पर्यंत त्याच्याच नांवाला तो शोभा देत राहील.

## ८. मजुरीची उत्पत्ति

तेव्हां साध्या व्यवहारापुरतें बोलायचें झालें तर स्वतःच्या श्रमानें निर्माण केलेल्या वस्तूवरच मनुष्यास खरा मालकी हक्क सांगतां येईल, आणि कांहीं गुंड त्याचा अपहार करूं शकतात तेवढा अपवाद सोडून हा हक्क सर्वत्र मानला जातो. पण जेव्हां एखादी वस्तू बनवायला अनेकांचे श्रम अवश्य असतात तेव्हां हा हक्क ठरवण्यांत अडचण उत्पन्न होतें. आणि जी वस्तूं करण्यांत फारच गुंतागुंत असते, ज्या ठिकाणी समाजांतल्या फारच मोठ्या संख्येचा हातभार लागतो अशा वस्तू कोणा व्यक्तीच्या मालकीची न होता समाजाच्या मालकीची होते. आणि व्यक्तीला त्याच्या मालकी हक्काचे चिन्ह म्हणून कांहीं नाणी दिली जातात. मग या नाण्यांना मजुरी म्हणतात. ही मजुरी त्या माणसानें ती वस्तू बनविण्यांत ज्या प्रमाणांत श्रम केले असतील त्या प्रमाणांत असते किंवा असायला पाहिजे. मग ही नाणी त्याच्या मालकीची होतात. मात्र त्यानें स्वतः बनविलेली काठी किंवा धनुष्य अशा वस्तूशी त्याचा जो वैयक्तिक घनिष्ठ संबंध जडलेला असतो तसा या वस्तूशी असत नाहीं. ती वस्तू समाजाच्या मालकीची झाली. समाजानें त्याला त्याच्या श्रमाची खूण दिली तेव्हां त्या वस्तूशी त्याचा संबंध सुटला. पण हे चिन्ह किंवा ही खूण दाखवून तो समाजापासून त्याला हवी असलेली दुसरी वस्तू घेऊं शकतो. याप्रमाणें त्याचा स्वतःच्या श्रमाशी म्हणजे मालकीशी असलेला घनिष्ठ संबंध कमी होतो पण त्याचा प्रकार आणि प्राकार किंवा विस्तार वाढतो.

## ९. मजुरी ठरावण्याची समस्या

अशा प्रकारें समाज संकीर्ण झाला म्हणजे मालकी हक्काच्या कल्पनेचा दुसरा टप्पा सुरूं होतो. मनुष्यानें जी वस्तू बनवण्यांत आपले श्रम खर्च केले तीच वस्तू त्याला मिळत नाहीं. त्या श्रमाचे चिन्ह नाण्याच्या रूपानें, म्हणजे पैशाच्या रूपानें त्याला मिळते. आणि हा पैसा मोबदला देऊन तेवढ्या श्रमाच्या अनेक वस्तू मिळूं शकतात, भण या ठिकाणीं अतिशय मोठी अगदी न सुटणारी समस्या उभी राहते. साऱ्या अर्थशास्त्राची समाजशास्त्राची ती कसोटी आहे. ही समस्या म्हणजे एका माणसाच्या श्रमाची दुसऱ्या माणसाच्या श्रमाशी तुलना कशी करायची ? या प्रश्नाला उत्तर नाहीं. तसें म्हटलें तर उत्तर आहे. पण त्याची शब्दानी व्याख्या करणें सोपे नाहीं. अनेक युगांतून समाजाची जसजशी प्रगती होत आहे तिच्या ओघांतून ती घडली जात आहे. ज्या त्या काळाला योग्य अशी तात्पुरती व्याख्या केली जाते उदाहरणार्थ 'पदार्थाची किंमत म्हणजे तिला बाजारांत मिळूं शकेल ती' अथवा 'पदार्थ बनविण्याला मनुष्याला किती तासाचे श्रम लागले असतील ती.' अशा व्याख्या केल्या जातात. एक व्याख्या अंशतः दुसरीपेक्षां चांगली असली तरी कालौघाशी कोणतीच टक्कर देऊं शकत नाहीं. समाजव्यवस्था बदलली की एक केलेली व्याख्या चुकीची ठरते. असे करीत करीत जेव्हां सत्ययुग येईल त्यावेळी अशा व्याख्यांची जरूरी लागणार नाहीं. कारण तेव्हां ती प्रत्येकाच्या अंतःस्फूर्तीने सहजच ठरून जाईल.

अशा प्रकारे किमतीची व्याख्या करणें अत्यंत कठीण असल्यामुळें समूहानें बनविल्या जाणाऱ्या वस्तूंची खासगी मालकीची

दा. म.

व्याख्या ठरविणें तितकेंच कठीण आहे. तरीपण या विषयी आपण आणखी थोडा विचार करूं.

## १०. मालकीचे तीन टप्पे

खऱ्या मालकीमधें मालकाच्या त्या वस्तूशी धनिष्ठ संबंध सहवास असतो तसा केवळ कायदेशीर मालकीमधें असत नाहीं. हा त्या दोन्हीमधें फरक आहे हें आपण वर पाहिलें. आणि सामूहिक रीत्या बनविलेल्या वस्तूमधें कोणाचे किती श्रम लागले हे ठरविणे कठीण असल्यामुळें ती वस्तू बनविणाऱ्यांचा संबंध कांहींसा दुरावतो ही दुसरी पायरी तिचाहि आपण विचार केला. आपण स्वतः बनविलेलें धनुष्य आपल्याला मिळण्याऐवजी आतां त्याला त्यानें केलेल्या श्रमाबद्दल कांहीं नाणीं मिळाली. त्यानें स्वतः वनवलेल्या वस्तूवर त्याचें जितके प्रेम असेल, तितकें कांहीं त्या नाण्यावर असूं शकत नाहीं दुसऱ्याजवळच्या नाण्यापेक्षां आपल्याजवळच्या नाण्यामधे त्याची विशेष अशी काय भावना असेल ? त्या नाण्यावर त्याचा कायदेशीर हक्क आहे यापेक्षा त्या नाण्याशी दुसरा कोणता संबंध असतो ? पण त्या नाण्यांचा जेव्हां तो कांहीं उपयोग करूं लागतो तेव्हां त्याचा त्या श्रमाशी दुरावलेला संबंधाची कांहींशी भरपाई होऊं लागते. ती नाणीं दुसऱ्याला देऊन तो एखादी कुदळ घेऊं शकतो. मग ती कुदळ जरी त्यानें स्वतः बनवलेली नसली तरी ती त्याची वस्तू होते. आणि दररोज जसजशी तो ती वापरू लागतो तसतसा तिच्याशी त्याचा अधिकाधिक संबंध जडूं लागतो. तिची त्याच्या हाताला संवय होते. जणूं त्याचा ती आणखी एक अवयवच. अशा प्रकारे ती कुदळ पूर्णपणें त्याची खऱ्या मालकीची वस्तू होते.

व्यक्तीच्या श्रमानें निर्माण झालेल्या वस्तूवरची मालकी हा पहिला टप्पा सामूहिक रीत्या बनविलेल्या वस्तूत लागलेल्या श्रमाबद्दल मिळालेले चिन्ह म्हणजे नाणी अथवा पैसा दुसरा टप्पा आणि ती वापरून तिच्या मोबदला पाहिजे ती वस्तू घेऊन तिच्यावर मालकी उत्पन्न होणें हा तिसरा टप्पा, असे हे तीन टप्पे झाले.

## ११. खरी मालकी सेवेने मिळते

खऱ्या मालकीची व्याख्या करायला या टप्प्यांचा विचार करणें हें एक महत्वाचें साधन आहे. हें स्पष्ट आहे. माझ्या श्रमाच्या मोबदला मिळालेली कांहीं नाणी जमवून मी ज्या वस्तू त्यांच्या मोबदला घेईन त्या वस्तू माझ्या मालकीच्या. अशा पैशांतून मी एक घोडा घेतला. पण तो जर मला पाठीवर बसूं देणार नाहीं पाडून टाकील, लाथा झाडील, तर तो मिळविण्या-करितां नाणी जमविण्यांत मी जे श्रम खर्च केले ते सर्व फुकट गेले असें म्हणावे लागेल. तो घोडा मी दुसऱ्याला वापरायला प्रतिबंध करीन एवढा कायदेशीर मालकी हक्क माझा त्याच्यावर राहील पण तो वापरण्याचे जर मला समाधान मिळत नसेल तर तो माझ्या मालकीचा आहे हे म्हणण्यांत अर्थ काय ? अथवा रस्किननें सांगितलेलें आपण उदाहरण घेऊं. बोटीनें प्रवास करणाऱ्या एका गृहस्थानें आपल्याजवळची सोन्याची नाणी पिशवीत घालून ती पिशवी कमरेला घट्ट कसून बांधून ठेवली. त्याला वाटलें आपल्या मालकीची ती नाणी अशा तऱ्हेनें सुरक्षित राहतील. पण बोट उलटून तो जेव्हा पाण्यांत पडला तेव्हां त्याला

त्याची चूक आढळून आली. तो नाण्यांचा मालक नसून ती नाणीच त्याची मालक ठरलीं कारण ती आपल्या बरोबर त्यालाहि पाण्याच्या तळाशी घेऊन गेली. खरी मालकी म्हणजे त्या वस्तूचा उपयोग म्हणजे त्या वस्तूवर त्याची सत्ता म्हणजेच ती वस्तू त्याच्या कह्यांत असली पाहिजे. त्याच्या इच्छेप्रमाणें वाकली पाहिजे. जगांतली कोणतीच वस्तू सुखासुखी आपल्या मालकीची होऊं शकत नाहीं. ती आपल्या पराक्रमानें काबीज करावी लागते. आपली जीवन-शक्ति तिच्यासाठीं खर्च झाली तरच ती आपली होते.

याचें एक उदाहरण मला माहीत आहे. एक कोचमन आपल्या मालकाच्या घोडयांची सेवा अगदी मनापासून करी. तो तबेल्यांत गेला कीं ते फुरफुरूं लागत. त्याच्याशी घसटू लागत, त्याचे अंग चाटू लागत. हा कोचमन त्याना हवे तसे सहजी वळवू शके. त्या घोडयांचा मालक मोठा शेअर ब्रोकर होता. त्याला त्यांची थोडी देखील ओळख नव्हती कीं खातरहि नव्हती. तो त्यांचा कायदेशीर मालक होता पण कोचमन खरा मालक होता. अशा ठिकाणी कायदेशीर मालकीहि मर्यादित असते. मालकाच्या मनांत एकाद्या विशिष्ट घोडयावरून फिरायला जायचे असेल पण त्याच्या मोतद्दाराच्या मनांत नसेल तर तो अनेक सबबी काढील कीं त्या मालकाला खोडून काढता येणार नाहींत. बाग तर माळयाच्याच मालकीची असते असें म्हणतात. कोणते बी लावायचे, कोणती झाडे छाटायची हें त्याच्या मनांत असेल तसेंच होतें. श्रीमंताच्या मोठ्या घराचे खरे मालक नोकरच

असतात. असें सर्रास म्हटलें जातेच ना ! उत्पत्तीमधे असो, किंवा उपयोगांत असो,.खरी सत्ता ही सेवेचाच परिणाम होय.

## १२. संग्रहाचे वेड

पैशानें मिळणाऱ्या सत्तेंत किंवा मालकीमधे वैयक्तिक मानवी संबंध फारच थोडा येतो. संस्कृतीच्या ज्या विशिष्ट अवस्थेत माणूस पैशाच्या मागे लागलेला असतो, जेव्हां खासगी मालमत्तेविषयीं पूज्य बुद्धि असते, मालकी हक्काला प्रतिष्ठा असते, त्या अवस्थेत खासगी मालमत्तेवर कायदेशीर हक्क पूर्ण असला तरी, खरी सत्ता सर्वांत कमी असते. यावेळीं माणसाला संग्रह करण्याचे जणू वेडच लागते. वस्तूंचा उदार अंतःकरणानें आनंदानें भोग घ्यावा हें बाजूस राहून ती सांठवून ठेवण्यांतच आनंद वाटूं लागतो. आणि मग पैसा हें वस्तू मिळवण्याचे साधनन राहतां तो संग्रह करणें हेंच ध्येय होऊन बसते. आपल्या जवळच्या पैशानें आपल्याला काय घेतां येईल हें न पहातां, आपल्या जवळ असलेल्या वस्तूची किंमत पैशांत किती होईल हेंच तो सदा पाहूं लागतो. वस्तूवरील खरी सत्ता ही संपत्तीची व्याख्या न राहतां, वस्तूंचा संग्रह म्हणजे संपत्ती अशी ती होते. आणि मग ती एक विवंचनेची गोष्ट होऊन बसते. संग्रहाचें हे वेड लागलेल्या दुर्दैवी माणसाला मग कधीहि स्वस्थता लाभत नाहीं. तो शेतामागे शेते घेईल. घरामागें घरे बांधील. पुस्तके घेईल, कपडे खरेदी करील. खाणेंपिणें मेजवान्या समारंभ करीत राहील. मनांत आशा अशी कीं यामुळें आपल्या मनांला समाधान लाभेल. प्रत्येक वेळीं वाटावें कीं

एवढें घेतलें म्हणजे पुरे. पण त्यानें समाधान न होता त्याच मार्गानें तो सारखा पुढें जात असतो. अर्थात् तो उलट दिशेनें जात असल्यामुळें शांतीच्या धेयापासून तो दूरच जात असतो. 'खाण्याचा उद्देश शरीर पोषण होय याचा विचार न करितां चांगलें लागलें कीं अधाशी मुले जशी खा खा खात सुटतात तसें आपण आहो' असे जेम्स हिंटन म्हणतो. मुलाना खाण्याच्या पदार्थाचा उद्देश समजत नाहीं, तसा आपल्याला मालमत्तेचा उद्देश कळत नाहीं.

जिभेचे चोचले पुरवणें किंवा तें पोटांत भरून ठेवणें हा खाद्य पदार्थांचा उद्देश नाहीं. खाद्य पदार्थ पोटांत अडून न राहतां आंतड्यांतून पुढे सरकत गेला तरच शरीराचें पोषण करितो. संपत्तीची, मालमत्तेचीहि तशीच गोष्ट आहे. वस्तू कोठारांत किंवा लोखंडी तिजोरीमधें कुलुपांत बंद करून इतक्या संपत्तीचा मी मालक आहे एवढें समाधान मानून बसणें हा कांहीं वस्तूंचा वा संपत्तीचा उद्देश नाहीं. पदार्थ एके ठिकाणीं साठू लागला कीं त्या ठिकाणीं दोष उत्पन्न होऊं लागतो. 'या जगांत मिथ्या द्रव्य संचय करूं नकोस तें द्रव्य कसरीच्या भक्षस्थानी पडेल किंवा गंज खाऊन टाकील नाही तर चोर तरी लुटून नेतील' असें ख्रिस्तानें म्हटलें आहे. 'दानं भोगो नाशः तिस्रो गतयो भवन्ति वित्तस्य, यो न ददाति न भुंक्ते तस्य तृतीया गतिर्भवति'

## १३. संग्रहापासून हानि

मनुष्याचे जीवन एखाद्या ज्योतीसारखें आहे. सतत तूप किंवा तेल घालीत राहिलें तरच ज्योत तेवत राहील त्याचा

पुरवठा कमी केला कीं ज्योतीचे तेज कमी होत जाईल. आणि तेल समईत जळायला न घालतां जर भांड्यांत नुसते साठवून ठेवलें तर ज्योत विझून जाईल. आपल्याला वापरतां येईल भोगतां येईल तेवढें वापरून उरलेले देत राहिले पाहिजे. वापरता येईल तेवढेच जवळ ठेवले पाहिजे.

श्रीमंतांच्या हवेलीमधे जा. तेथें तुम्हाला काय दिसेल ? शेल्फावर शेकडों पुस्तकावरचा कधी धुरळा निघालेला नाहीं, त्यांना कसर खाऊन टाकींत आहे. कित्येक दिवाणखानें, खोल्या वर्षावर्षांत उघडल्याहि जात नाहींत. फरनीचर मधून उबटलेला वास येतो आहे. कपाटामधें कपड्यांच्या घड्या पडल्या आहेत. ते किती आहेत त्याची गणतीहि नाहीं. नाणी, शेअर सर्टिफिकीटें, सरकारी कर्जरोखे, जवाहीर, दागिने तिजोरीमधे किंवा बँकेच्या व्हॉल्टमधे साठवून ठेवले आहेत. यांचा कांहीं प्रत्यक्ष उपयोग आहे काय ? लठ्ठ माणसाच्या अंगांत आणखी चरबीची वाढ व्हावी किंवा नीट न जळणाऱ्या ज्योतींतून धूर आणि काजळ निघावें त्यासारखी ही साठविलेली संपत्ती आहे. अशा साठलेल्या संपत्तीमुळें माणसाची शक्ति क्षीण होते आणि जीवनांतील सौंदर्य सुबकपणा आणि प्रतिष्ठाहि नाहीशी होते. श्रीमंताच्या मनाला शांति नाहीं. त्याचा कुत्रा शांतपणें, निश्चितपणें याच्या दारांत झोपू शकतो, पण मालकांच्या अंतःकरणांत अनेक चिंता त्याला सतावीत असतात.

सध्या जगांत अशी न पचलेली संपत्ती खूप साचलीं आहे. त्यामुळें त्याचे आरोग्य नाहीसे होऊन तें मरणाच्या पंथाला

लागलेलें आहे. कारण तेथें उच्च वर्गीयाजवळ ज्यास्त संचय झाल्यामुळें अपचनाचा रोग जडून ते रोगिष्ट, नेभळट, नीतिभ्रष्ट होत आहेत. तर तेथेंच दुसरीकडे गरीब लोक उपाशी मरत आहेत.

## १४. मालकी म्हणजे वस्तूचा योग्य उपयोग

याहि दृष्टीनें जो वस्तूचा उपयोग करीत असेल त्यालाच वस्तूवर मालकी सांगण्याचा कांहीं हक्क प्राप्त होईल. पण त्याबरोबरच आणखीहि एक महत्वाचा प्रश्न उभा राहतो. तो म्हणजे वस्तूच्या योग्य उपयोगाचा. एखादा माणूस आपला घोडा बेलगामपणें उडवीत रस्त्यांवरील बायकापोरांना इजा करूं लागला तर त्याला प्रतिबंध केला जाईल हें उघड आहे. लहान मुलाना चाकू वापरता येत नाहीं म्हणून त्याच्या हातून आपण काढून घेतो. त्या प्रमाणें एखाद्या माणसानें स्वत: बनविलेली वस्तू असली पण ती दुसऱ्याना हानिकारक असेल तर त्याच्याकडून समाज ती वस्तू काढून घेतो. याप्रमाणें समाज त्याच्या मान्य मालकीवरहि नियंत्रण घालूं शकतो. पण योग्य उपाय काय याची व्याख्या समाज करीत नाहीं. मीहि ती येथें करीत नाहीं. ती व्याख्या क्रमाक्रमानें अनुभवानेंच ठरणार आहे. समाजांतील प्रगति संथपणें होत आहे. समाजानें वेळोंवळीं बदलत्या परिस्थिती प्रमाणें ही व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे, पण दर वेळीं तो फसला आहे. समाजाचे व त्यांतील घटक व्यक्तीचें संबंधामधे जोंपर्यंत मेळ असणार नाहीं, तोंपर्यंत व्यक्तीची मालकी योग्य होणार नाहीं. मनुष्या मनुष्यामधें जेव्हां समता स्थापन होईल

तेव्हांच या अवघड प्रनांचें उत्तर मिळूं शकेल मनुष्य जेव्हां आपल्या स्वत:ला ओळखतो तेव्हां त्याला आपल्या स्वामित्वाचें रहस्य समजतें. खासगी मालकीचे हक्क सोडून जेव्हां तो गरीबी पत्करतो तेव्हां सर्व समाजाची संपत्ती त्याचीच होते. त्याची संपत्ती अगणित होते. तुकारामानें म्हटलेंच आहे 'माझे धन कण घरोघरीं.'

## १५. मालकीचा इतिहास

या प्रश्नाचा आतां थोडा ऐतिहासिक दृष्टया विचार करूं खासगी मालमत्तेवर कायदेशीर हक्क इतिहासकालांत नेहमीच मान्य झालेला होता असें नाहीं. आणि पुढेहि तो सर्वदा मान्य केला जाईलच असें नाहीं. खासगी मालमत्तेला कायदा मान्यता देत नव्हता असा पूर्वीं एक काल होता तसा पुढेहि एक काल येईल कीं जेव्हां कायदा खासगी मालकीला संरक्षण देणार नाहीं. इतिहाससंशोधनांत आंता असें स्पष्ट आढळून आलें आहे कीं एका वेळीं मानव प्राणी कळप किंवा संघ करूनच रहात होता. व्यक्तीला तेव्हां स्वतंत्र अस्तित्व नव्हते. कोलंबसनें नवीन भू-खंडाचे शोध लावले त्यावेळीं वेस्ट इंडियन जमातीसंबंधी त्यानें आपल्या एका पत्रांत लिहिलें आहे कीं या जातीमधें खासगी मालकी हक्क नव्हता सर्व वस्तू समाजाच्या मालकीच्या असत. पॅसिफिक समुद्रांतील समोआ बेटांत एक इंग्रज प्रवासी गेला होता तो तेथील लोकांना ग्रेट ब्रिटन वगैरे सुधारलेल्या देशांतल्या चालीरीति कशा असतात हे सांगत होता. तेथें वस्तूवर मनुष्याचा व्यक्तीगत खासगी हक्क असतो आणि तेथें एकाजवळ

८६१२ 

त्याला खाववणार नाहीं इतकें अन्न पडून असतानां त्याचा शेजारी खायला नाहीं म्हणूच उपाशी असतो. सामाजिक मालकीच्या मागासलेल्या अवस्थेतल्या त्या असंस्कृत लोकांना अशी स्थिति असूं शकते याची कल्पनाही करितां येईना. पाश्चात्य संस्कृतीची ही देणगी किती गौरवास्पद आहे हें त्या इंग्रजानें कितीहि समजावून सांगितलें तरी त्या रानटी लोकांच्या मठ्ठ डोक्यांत कांहीं शिरेना.

प्राचीन काळीं जेव्हां माणूस टोळचा करून रहात होता, टोळीमधेंच त्याचे रक्ताचे शरीरसंबंध होते, त्यावेळीं व्यक्तीची मालमत्ता करण्याची इच्छा मनुष्यांत तीव्र असत नाहीं. त्या टोळीची मालमत्ता असते पण मालमत्तेवर व्यक्तीचा वैयक्तिक हक्क असत नाहीं. समाजाच्या या अवस्थेंत सर्व दृष्टीनें पाहिलें तर असें दिसून येईल कीं व्यक्ति समाजांत पूर्णपणें विलीन झालेली असते, अगदी मिळून गेलेली असते. वस्तूवर व्यक्तीचा हक्क असतो, पण त्याचा एकटयाचा असत नाहीं. इतर सर्वांच्या जोडीनेच त्यांचा हा हक्क. मुंग्या, मधमाशा वगैरे प्राण्यामधें अशीच स्थिति असते. तो दुसऱ्या टोळीशीं निकरानें लढेल, त्यांचा जीव घेण्यास कमी करणार नाहीं, आपल्या टोळीकरितां दुसऱ्या टोळीच्या वस्तू लुटून आणील पण यापैकीं कोणतींच गोष्ट आपल्या टोळींतल्या लोकाशी तो करणार नाहीं. त्याचें व्यक्तित्व त्याच्या टोळीशी एकरूप होऊन गेलेलें असते.

पुढील काळांत व्यक्तीला महत्व आलें त्याबरोबरच खासगी मालकीलाहि महत्व आलें. हे व्यक्तीचे हक्क शाबित करण्याकरितां अनेक घोटाळचाचे कायदे बनले आणि ते आतांच्या

काळांत इतके गुंतागुंतीचे आणि अगणित बनले आहेत कीं ते सर्व केव्हां ढासळून पडतील याचा नेम नाहीं. आपल्या संस्कृतीवरहि कायद्याचीं पुटावर पुटें चढलीं आहेत त्याचा अर्थ काय ? मानवी प्राण्याच्या इतिहासांत या गोष्टीलाहि कांहीं कारण, कांहीं आवश्यकता असेलच.

मानवाच्या विकासाचा तो एक भाग आहे असें मी मानतों. मुलाची पूर्ण वाढ झाली म्हणजे तें आईच्या गर्भातून बाहेर येतें त्याप्रमाणें व्यक्तीहि समाजापासून वेगळीं होण्याची आवश्यकता असेलच. व्यक्तिमत्वाचा धडा त्यानें शिकावा, आत्मशक्तीचें त्याला भान व्हावें, वस्तूंवर त्यानें सत्ता चालवावी, आत्मौपम्य बुद्धीनें दुसऱ्याशी कसें वागावें हें त्यानें जाणावें, स्वार्थासाठीं धडपडण्यांत किंवा लोभाविष्ट होण्यांत किती दुःख आहे हें त्यानें समजून घ्यावें. हे सर्व धडे समजल्यावर म्हणजेच आत्म-साक्षात्कार झाल्यावर त्यानें पुनः केवळ आपल्या जमातींतच नव्हे तर त्याहून अधिकाधिक मोठ्या समाजांत म्हणजे अखेरीस मानवतेत आपल्याला विलीन करूं टाकावें असा त्याचा उद्देश असावा.

व्यक्तीच्या विकासाच्या या प्रक्रियेला खासगी मालकीची व्यवस्था फार सहायभूत झाली असें मला वाटतें. याला सुरवात लहानशीच झाली, पण होतां होतां प्रत्येक व्यक्ती समाजांतील इतर व्यक्तींपासून अगदीं विभक्त झाली असा परिणाम घडून आला. व्यक्तीव्यक्तीमधें कृत्रिम भेदांचा अभेद्य डोंगर उभा राहिला. स्वार्थ बुद्धीची अशा तऱ्हेनें आतां एवढी वाढ झाली

आहे की पूर्वी केव्हांहि ती इतकी प्रखर नव्हती. व्यक्तीला आत्मभान होण्याला त्याची जरूरी होती आणि त्याशिवाय तें झालेंहि नसतें, एवढें मात्र त्या वाईटांतून चांगलें निघालें. या जाळ्यामधे किंवा मधुकोशामधे प्रत्येक व्यक्ति आपल्या वेगळ्या कोशामधे, सवत्या सुभ्यामधे खासगी मालमत्तेच्या संरक्षणार्थ बनलेल्या अनेक कायद्याच्या जंजाळात बसून टक्केटोणपे खात वरील धडे शिकत आहे. मानव विकास पावत आहे. त्याचें हें शिकणें संपलें, त्याचा पूर्ण विकास झाला म्हणजे या मधल्या भिंती नाहीशा होतील आणि खासगी मालमत्तेची संस्था जशी क्रमाक्रमानें वाढली तशीच क्रमाक्रमानें नाहीशी होईल.

## १६. मालकी मानव विकासाची एक पायरी

म्हणून खासगी मालमत्तेविषयीं जें कांहीं मी आधी कठोर उद्गार काढले आहेत ते मी मागें घेतों. मनुष्याच्या विकासाची ती एक आवश्यक पायरी आहे. इतर अनेक गोष्टीप्रमाणें खासगी मालकी हा केवळ आभास आहे किंवा फार झालें तर तें एक चिन्ह आहे, निशाणी आहे. रानटी अवस्थेंतून बाहेर पडल्यावर म्हणजे तो जणू अज्ञानावस्थेंतून सज्ञान झाल्यावर त्याला मालमत्तेवर मालकी हक्क प्राप्त होतो आणि सध्याच्या काळांत ही मालमत्ता इतकी विविध आणि अगणित झाली आहे कीं त्याला तिचे काय करायचे ते कळेनासें झालें आहे. तिचा कसा उपयोग करायचा याची त्याला कल्पनाहि असत नाहीं. म्हणून तो ती साठवून संग्रह करूत ठेवतो, लपवतो, तिच्या मागे धांवतो, भोवती नाचतो, कवटाळतो, मुके घेतो, डोक्यावर ठेवतो, बोटाच्या किंवा

दंडाच्या भोवती गुंडाळून ठेवतो. तिच्या पाया पडून तिची पूजा करतो, पेटीत घालून त्या पेटीला कुलूप घालतो आणि रात्रभर तिचेच चिंतन करीत जागत बसतो. गादींत शिवून ठेवतो, बँकामधें पुरून ठेवतो. मग ती बँकही तशीच वाढत जाते. दुकानापुढ घुटमळतो, काचेच्या तावदानांतून टक लावून पहात रहातो, ती संभाळायला पिस्तूल विकत घेतो, रखवालदार ठेवतो. आपल्या सारख्याच कांहीं लोकांना विशेष पोशाख करून न्यायाधीश बनवितो. मग ते मालमत्तेचा न्याय सांगतात तो त्याला वेदवाक्य वाटतो. एकंदरीत आपण हें काय करीत आहों याची कल्पना नसल्यामुळें हे सर्व वेडेचार तो करीत फिरतो. पण त्याच्या या वेडेपणांतहि एक प्रकारची शिस्त आहे. या साऱ्या माकडचेष्टानीं आपल्याला कांहीं तरी भरीव लाभ होईल अशी त्याला आशा असते, आणि एकप्रकारें ती सफलहि होते. या वस्तुसंचयांतून त्याला पुढें सत्य वस्तूचाहि शोध लागतो आणि पुढे आत्मभान होऊं लागते.

ज्या भौतिक मालमत्तेच्या, मानव मागे लागलेला असतो ती सर्व मृगजळासारखी आहे. कांहीं परिस्थितींत कांहीं वेळी तिची जरूरीहि आहे. प्रथम तिचे आकर्षण अत्यंत तीव्र असते तीमुळें तो भयंकर ग्रासला जातो, तिच्यामुळें त्याला जबर आवेश चढतो. पण कालांतरानें त्याला आपले विकार आवरायला येऊं लागले म्हणजे तिचे आकर्षण कमी होऊं लागते. प्रथम प्रथम क्षुद्र हक्कासाठीं अटीतटीनें भांडायला सिद्ध असतो, त्याकरितां न्यायकोर्टाकडे धावायला तत्पर असतो. पुढे त्याचा जोम नाहीसा होतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मालमत्ता त्याच्याकडून कोणीं काढून नेली तर त्याला बरेंच वाटतें एक ब्याद गेली, काळजी दूर झाली, डोक्यावरचें ओझें उतरलें असा आराम त्याला वाटतो.

पैशाने लाभ मिळतो, सत्ता मिळते खरी पण प्रत्येकाला ती मिळतेच असें नाहीं. खरें बोलायचे झालें तर, माणसाच्या अंतर्यामीं शक्ति असेल तरच सत्ता संपत्ति मिळते. पैसा हें एक त्याचें बाह्य चिन्ह आहे. अंतःशक्तीचें खरें भान होतें तेव्हां बाह्य चिन्हें निरोपयोगी होऊन गळून पडतात. आपल्या जवळच्या नाण्यावर कोणाचा शिक्का आहे. दुसऱ्याचा की स्वतःच्या कर्तबगारीचा हे माणसाला उमगलें कीं शाश्वत जीवनाची ओळख झाली असें समजावें.

हे विषयांतर सोडून ऐतिहासिक भागाकडे पुनः वळूं. सध्याच्या काळीं पैशानें प्रवास, कला, ग्रंथ, विश्रांति यासारखे व्यावहारिक फायदे होतात, त्याकडे दुर्लक्ष करून किंवा त्याना कमी लेखून चालणार नाहीं, एका विशिष्ट अवस्थेंत मनुष्याच्या विकासाला, उन्नत्तीला या सर्वांची जरूरी आहे. पण जेव्हां समाजाचा पूर्ण विकास होतो, बाल्यावस्थेंतून तो बाहेर पडतो तेव्हां या फायद्याची किंमतहि दिवसेदिवस कमी होत जाते. आर्ट गॅलरी, मोफत वाचनालयें उघडली गेलीं औद्योगिक प्रश्न सुटले म्हणजे कलेचा, ग्रंथांचा लाभ सहज करून घेतां येईल. अवश्य तेवढी विश्रांतीहि मिळेल. राहता राहिला प्रवास, तोहि अगदीं स्वस्त झाला आहे व आणखीहि होईल असें झालें म्हणजे खासगी मालमत्तेची आवश्यकताहि उरणार नाहीं. ती अडचणच होऊन

बसेल. मग कायदा तिला मान्यता देणार नाहीं. पुनः वस्तूवर समाजाची मालकी प्रस्थापित होईल आणि अशा तऱ्हेनें मानव पुनः पूर्वस्थळावर पण अधिक उच्च अधिक विकसित स्थितीला प्राप्त होईल.

## १७. जीवनाचा प्रश्न

जीवनाचा प्रश्न म्हटला तर अत्यंत सुलभ आहे. सध्याच्या मपक्यामुळें त्याच्या डोळयावर जो भ्रमाचा पडदा आला आहे तो दूर होऊन माणसामाणसामधले संबंध सीधे व प्रामाणिक झाले की ही गोष्ट प्रत्याला येईल. व्यक्तीच्या जीवनांत जे प्रश्न उत्पन्न होतात तेच प्रश्न अखेरीस समाजापुढें उभे राहतात. मनुष्याचा भौतिक वस्तूशी संबंध काय ? या प्रश्नावरच भौतिक मालमत्तेचे महत्व अवलंबून आहे. हा संबंध समजला की इतर सर्व प्रश्न, जसा सूर्य वर आल्यावर धुकें जसें नाहीसें होतें तसे नाहीसे होऊन जातील. अन्न, वस्त्र, घर, शिक्षण या विषयी माणसाला मुळींच चिंता रहाणार नाहीं. प्रवासाचा प्रश्न उरतो पण तो तितका आवश्यक नाहीं. थोरो म्हणतो 'झांझीबारची मांजरें मोजायला पृथ्वी प्रदक्षणा करायला नको. ब्राझीलला जाण्याइतकें द्रव्य तुमच्याजवळ नसेल तर त्या नादांत पडू नका एकदम स्वर्गाचा मार्ग धरा. तो प्रवास मोठा आहे खरा पण वाटेत पहाण्यासारखेंहि पुष्कळ आहे. श्रीमंतांना तर मी म्हणेन परगांवचा प्रवास करण्यापेक्षां आपलें स्वतःचें गांवच हिंडून पहा झकपक पोषाक टाकून द्या आणि दुःखी दरिद्री लोकांमधें फिरा. सुताराचा रंधा ओढा, अरेकसाचा करवत चालवा, कोळशाच्या

खाणींत काम करा. रस्त्यानें ओझें वाहणाऱ्या मजुराचें ओझें उचलण्यास हातभार लावा. या ठिकाणीं तुम्ही कल्पनाहि करूं शकणार नाहीं अशा, आश्चर्यकारक गोष्टीं तुम्हाला ऐकायला आणि कोठल्याहि प्रवासांत दिसणार नाहीत अशी विलक्षण दृश्यें पहावयांस मिळतील.'

इतर अनेक प्रश्नाप्रमाणें हा मालमत्तेचा प्रश्नहि अप्रत्यक्ष मार्गानें सुलभपणें सुटतो. म्हणजे या भौतिक वस्तू मिळण्याचे श्रम न करितां भौतिक वस्तू ज्या मूळ वस्तूची केवळ निशाणी आहे ती मिळवण्यांकरितां झटणें. 'देवाच्या राज्याकरितां झटा म्हणजे ऐहिक वस्तू आपोआप मिळतील.' असें बायबल सांगते.

हे शब्द संदिग्ध रूपकवजा वाटले तरी माझ्या मतें ते अक्षरशः खरे आहेत. सध्याची पिढी सोनें-रुपे, नवनवी यंत्रे, व्यापार उदीम यांच्या मागे धावून थकून गेली आहे. भौतिक वस्तूवर सत्ता चालविण्याऐवजी, तिची दास बनली आहे. त्या पिढीला हे शब्द इशारा देत आहेत कीं, 'तुम्ही जी वस्तू शोधत आहांत ती सापडण्याचा हा मार्ग नव्हे. तुम्ही पुढे ठेवलेलें आदर्श भंगून गेले आहेत. तुम्ही त्याची कितीही सेवा केली तरी त्यांच्यापासून तुम्हांला कांहींच मिळणार नाहीं. हा शोध निरर्थक होत आहे. सुखाच्या मागें लागून आम्ही दुःख पैदा केलें आहे. संपत्तीकरितां आटापिटा करून विपत्ती मिळविली आहे. तांत्रिक ज्ञान संपादन करितांना शहाणपणाचा आम्हांला विसर पडला आहे. आणि भौतिक वस्तूना देव्हाऱ्यांत पुजून आत्मशक्तीला पदभ्रष्ट केलें आहे. या आत्मशक्तीचें भान

झाल्याशिवाय, इतर वस्तूवरहि आमची सत्ता चालणार नाहीं. भौतिक वस्तू पुजायच्या नाहींत, त्यांना राबवायचें आहे. सृष्टि ही तिच्या मध्यबिंदूपासून परिघापर्यंत एकजिनशी असते. हा तिचा मध्यबिंदू सर केल्याशिवाय तिचा परिवार तुम्हाला वश होणार नाहीं. तोंपर्यंत ती तुमचा उपरोध करील, तुम्हाला तुच्छ लेखील, काळ्या छाया दाखवून तुम्हाला भिववील. मोहांत टाकून तुमचें विडंबन करील. पण खरोखर तुम्हाला कसलाच लाभ होणार नाहीं, की कशावर तुमची सत्ताहि चालणार नाहीं.

## १८. ही तत्वें व्यवहार्य आहेत

शेवटी अमूर्त अव्यक्त सिद्धांताच्या जंगलांत आपण भलती-कडेच झुकूं नये म्हणून हीं तत्वें व्यवहारांत कशी लावता येतील हें पाहूं. जी तत्वें मी सिद्ध करूं पहात आहे तीं, माझ्यामतें अत्यंत व्यवहार्य आहेत. संपत्तीमधे माणसाविषयीं कळवळा असेल तरच ती संपत्ती या संज्ञेला पात्र होईल. केवळ कायद्यानें मिळणाऱ्या संपत्तींत कांहीं अर्थ नाहीं. उलट ती समाजाला हानिकारक आहे हें दाखवून देण्याचा माझा प्रयत्न आहे. सध्यांच्या आपल्या समाजांत तिची अनर्थकारकता अगदी शिखराला पोचलीं आहे. श्रीमंतांची श्रीमंती दूषित झालेली आहे, कुजलेली आहे. जमीनदारांची जमीनीवरील मालकी खरी नाहीं. ती मुनीम किंवा मुखत्याराकडे सोपवलेली असते. ते भाडोत्री नोकर. त्यांच्यामधे माणुसकी कोठली ? मोठ्या कारखान्यांची स्थितीहि अशीच असते. हे कारखाने कायद्यानें भागीदार किंवा शेअर होल्डर्स यांच्या मालकीचे; त्यांना कारखान्यांत काय चालतें याचा पत्ताहि

असत नाहीं. डायरेक्टर्स किंवा मॅनेजर मजुराना पिळून काढीत असतात, याची त्यांना दादहि असत नाहीं. ठरलेलें डिव्हीडंड दर सहा महिन्यांनीं पदरांत पडलें म्हणजे मग त्यांची तक्रार नाहीं. ही खोटी मालकी नाहींशी करून त्यावर खरी सत्ता प्रस्थापित करणें हे आपलें व समाजाचें कर्तव्य आहे. आणि हें कर्तव्य आपण अगदीं ताबडतोब केलें पाहिजे. कारण, हा रोग आतां फारच वाढला आहे आणि मोठ्या ऑपरेशन शिवाय मरण चुकणार नाहीं. आपण जमीन मालकाना बजाविलें पाहिजे की 'तुम्ही जर आपली जमीन माणसाच्या उपयोगांत आणली नाहीं, समाजाचे विश्वस्त म्हणून तुम्ही वागला नाहीं तर या जमिनी तुमच्याकडून ताबडतोब काढून घेतल्या जातील. कारण तुमच्या चैंनीनें प्रत्येक एकरामागें तुम्ही तुमच्या एका भावाच्या मरणाला कारणीभूत होत आहांत. ज्या माणसाजवळ दहा मळें आहेत, त्याला आम्ही म्हणू तुम्ही आपल्या एका शेतावर जाऊन स्वतः कसून मेहनत करणार असाल तर जरूर करा, त्या शेताचे तुम्ही खरें मालक आहां. पण ज्या बाकी नऊ शेतावर आतां तुमचा कायदेशीर हक्क आहे म्हणून दुसऱ्याला कसायला प्रतिबंध करितां तसें आतां चालणार नाहीं. या शेतावरचा तुमचा अधिकार जास्त विचार न करितां नष्ट केला जाईल.

कंपन्यांचे शेअर ज्यानी घेतले आहेत, त्यानां आम्ही विचारूं की ही तुमची संपत्ती आहे तिचें तुम्ही काय करणार आहां ? तिच्यापासून समाजाचा कांहीं फायदा आहे काय. तुमच्या कार-खान्यांत माणुसकीला कांही स्थान आहे की नाहीं ? तुम्ही

भागीदारांच्या सभांना जमता तेव्हां कारखाना समाजाला हितकर व्हावा, त्यांत तयार होणाऱ्या वस्तू चोख, शुद्ध, निर्भेळ आणि उपयुक्त असाव्या, कामगारांना योग्य मजुरी मिळावी, यासंबंधी कधीं विचार करतां काय? तसें करीत नसाल तर तुमची मालकी व्यर्थ, एवढेंच नव्हे तर हानिकारकहि आहे. तुमची त्या कारखान्यावरची कायदेशीर सत्ता तुम्ही जर स्वतःच्या बडेजावाकरितां, दुसऱ्याना लुबाडून आपली तुंबडी भरण्याकरितां वापरीत असाल आणि ज्याना त्या कारखान्याचा खरा उपयोग आहे, ज्याना तो नीट चालवतां येतो त्याना जर चालवूं देणार नसाल आणि अशामुळें माणसाच्या प्रगतीचा ओघ थांबवून धरणार असाल तर आम्ही तुम्हाला बजावून सांगू कीं 'आतां तुम्ही येथून चालते व्हा. तुमचे तें काळें तोंडही आम्हांला पुनः दिसूं नये'

वस्तूवर कायद्यानें उत्पन्न होणारी मालकी आपण जितक्या लवकर नष्ट करूं तितकें चांगलें. माणूस स्वतःच्या हातानें किंवा श्रमानें जी वस्तू बनवील तिच्यावरची मालकी समाज केव्हांहि मान्य करील इतका चांगूलपणा त्याच्याजवळ आहे. आणि ती वस्तू जोंपर्यंत योग्य कामीं तो वापरील तोंपर्यंत त्याचा हक्क नष्ट होणार नाहीं. हे मालकी हक्क सार्वकालीन अलिखित कायद्याकडे सोपविणें चांगले. याखेरीज जे हक्क आहेत ते सैतानी आहेत. वस्तू बनविण्यामधे स्वतः श्रम न करितां लाभणारी सत्ता व तिचा लोकांना दाबून टाकण्यांत त्यांची अवनति होण्यांत तिचा होणारा उपयोग ही आसुरी संपत्ति होय. आणि असल्या आसुरी संपत्तीचे रक्षण करण्याकरितांच कायद्याचा

जन्म झाला आहे. हा लांडीलबाडीचा डोलारा क्रमाक्रमानें जमीन दोस्त करणें हेंच आपलें ध्येय असलें पाहिजे. आज जो मूठभर लबाड लोकांच्या हातांत अफाट खोटा संपत्तिसंचय झाला आहे तो नष्ट झाला म्हणजे खरी संपत्ति तेवढी शिल्लक राहील. सध्या खोटी संपत्ति अफाट वाढल्यामुळे खऱ्या संपत्तीचा पत्ताच लागणें मुष्कील होऊन बसलें आहे.

आम्ही वर जीं तत्वें सांगितलीं तीं अनेक गोष्टींत ताबडतोब अमलांत आणतां येतील. उदाहरणार्थ आम्ही वर म्हटल्याप्रमाणें कसेल त्याची जमीन हे तत्व व्यक्तिगत वस्तूच्या बाबतींत ज्याला खरी जरुरी आहे त्याची वस्तू असें होईल. तसेंच आम्ही असेंहि म्हणू कीं पहिली पायरी म्हणून कोणाचेंहि व्यक्तिगत वार्षिक उत्पन्न निश्चित मर्यादेंत आणलें पाहिज. वाढते आणि प्रतिबंधक कर बसवून निरर्थक बेकामी पडलेली संपत्ति लोकांच्या उपयोगांत आणली पाहिजे. 'सुधारलेलीं' राष्ट्रें आज अत्यंत कुजून गेलेली, पोखरलेली आहेत. निर्जीव, अशुद्ध, विजायतीय द्रव्याचीं पुटेंच्यापुटें त्यांच्यावर चढत आहेत. असेंच काहीं दिवस चाललें तर या राष्ट्रांचा विनाश अटळ आहे. त्यांनी आपल्या कमरेला जें सोन्याचें ओझें बांधून ठेवलें आहे तें त्यांना तळाला नेल्याशिवाय सोडणार नाहीं. राष्ट्रीय संपत्ति लोकांच्या उपयोगाकरितां लोकानी वापरायला सुरवात करून निर्जीव संपत्तींत चैतन्य आणलें आणि तेंहि अगदी ताबडतोब तरच तरुणोपाय आहे.

## १९. सत्य युग

नैतिक आणि आध्यात्मिक न्यायाचा आपल्या सामान्य जीवनाशी संबंध असतोच. ऐहिक सिद्धांत आणि व्याख्या यांच्या

पार पलीकडे मनुष्याचें मनुष्यपण आहे. तीच मानवाची मालमत्ता किंवा गुणधर्म. ऐहिक मालमत्ता ही केवळ प्रतिबिंब किंवा निशाणी आहे. आपण त्या अदृश्य शक्तीशी प्रतारणा केली नाहीं, मनुष्यस्वभावाच्या ध्रुवताऱ्यांवरचें लक्ष ढळूं दिलें नाहीं त्या अदृश्य प्रांतातल्या संपत्तीला ताब्यांत ठेवलें तर ऐहिक संपत्ति आपल्यापुढें हात जोडून उभी राहील आपलें राष्ट्रीय सामाजिक जीवन शहाणपणाचें व भरभराटीचें होईल. हें आंतरिक वैभव न मिळवितां जर आपण ऐहिक कांचनाच्या मागें लागलों तर त्या सोन्याला राखेपेक्षा जास्त किंमत नाहीं.

प्रत्येक व्यक्ति स्वतःच्या हिताकडे पाहूं लागली तर परस्परांचे हितसंबंध विरोधी होऊन सर्वच क्षीण होतील. ज्या समाजांतली प्रत्येक व्यक्ति दुसऱ्याच्या सेवेकरितां झटत असेल व त्यामुळे दुसऱ्यांची सेवाहि ज्याला लाभेल, आणि अशा परस्परांच्या सहकार्यानें दोघांचीहि दैवी संपत्ति, सत्ता अनंत पटीनें वाढेल. अशी समाजाची समतेची आध्यात्मिक श्रेष्ठ नवरचना करण्यांकरितां झटणें हें कवि, तत्वज्ञानी किंवा राजकारणी पुरुष या सर्वांनी आपल्यापुढें ठेवण्याजोगें उदात्त ध्येय नाहीं काय ? इतिहासाकडे नजर टाकली तर समाजाची या ध्येयाच्या प्राप्तीकरितांच अनंतकाळ धडपड चालू आहे. सुरवंटाचे फुलपाखरू होताना त्याच्यामधे जे आंतरिक चलनवलन जे आळोखेपिळोखे चालतात तशासारखी समाजाची सध्याच्या काळीं स्थिति आहे. व्यक्तीचा आपल्या शेजाऱ्याशी स्वार्थाकरितां चाललेला कलह नाहीसा होणें म्हणजे समता. व्यक्तीच्या आणि त्याच्या शेजाऱ्याच्या हितामधें विरोध असणार नाहीं. ज्या ठिकाणी माणसामाणसामधें अनेक

भेदांच्या असणाऱ्या भिंती जमीनदोस्त झाल्या आहेत असें स्थान प्राप्त करून घेणें हीच खरी स्वतंत्रता. आणि हें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां मानवाची अनंत कालापासून धडपड आणि तयारी चालू आहे. यांत्रिक साचातून निघालेल्या वस्तूतलें कंटाळवाणें सादृश्य म्हणजे समता नव्हे. एका शरीराचे अनेक अवयव आहेत ते सर्व वेगळे आणि लहान मोठे आहेत, पण शरीराला ते सर्व सारखेच आहेत. प्रत्येकाला नेमून दिलेले स्वतंत्र, परस्पराना पूरक असें कार्य आहे. हें अवयव एकमेकानां पूरक कसें एक सुरांत काम करितात त्यामुळेंच शरीराला सौंदर्य आलेलें आहे. ही खरी समता हें खरें स्वातंत्र्य. समाजाची अशी रचना करणें हें समाजाचें ध्येय आहे स्वप्न आहे. हें अशक्य कोटीतील किंवा अप्राप्य नाहीं. माणसाचे शरीर अगदी निकोप राखता येतें त्याचप्रमाणें राष्ट्रपुरुषाचें शरीरहि निकोप कां करितां येऊं नये ? जुन्या रानटी वाटणाऱ्या काळांत ही स्थिति बीजरूपानें अस्तित्वांत होती आणि आतांचा संस्कृतीचा भपका नाहीसा झाला; सध्याचे अनेक प्रकारचे कलह शमून गेले म्हणजे ती स्थिति अधिक वैभवशाली आणि सार्वत्रिक प्राप्त होईल. प्रभात तारे पुनः गाऊं लागतील आणि स्वर्गाच्या दारांतला भेदाचा अडसर दूर होऊन या पृथ्वीवर स्वर्ग नांदू लागेल.

८५१३

# परवडतें काय ?

मी अलीकडे नूकतीच लहानशी शेती करायला सुरवात केली आहे. ती करायला लागून दोन महिनेहि झाले नव्हते एकढचांत शेती करणें तुम्हाला परवडते कां ? या प्रश्नाने अगदी प्रथम पासून मला भंडावून सोडलें. हा प्रश्न ऐकून ऐकून मी अगदी त्रासून गेलों हें मला कबूल केलें पाहिजे. बहीण, भाऊ, चुलते, मामे यानी तर वरील प्रश्न विचारलाच पण अगदी लांबचे नातेवाईक, एवढेंच नाहीं तर जे केवळ थोडेसेच परिचित होते, हे सर्व केव्हाहि सहज भेटले तरी त्यांचा पहिलाच प्रश्न तुम्हाला शेती 'परवडते काय' हाच. हा प्रश्न महत्वाचा आहे यांत शंका नाहीं, पण इतरहि अनेक प्रश्न तितक्याच महत्वाचे आहेत अशी माझी भोळी समजूत होती. पण हा एकच प्रश्न सारखा कां विचारला जातो या मला गूढचें पडलें. पण लौकरच माझी चूक माझ्या ध्यानांत आली. माझ्या पांढरपेशी मित्रापैकी कोणीहि मी करीत असलेलें काम जरूरीचे आहे काय ? समाजाला त्याचा कांहीं उपयोग आहे काय ? या कामानें शरीराचे आरोग्य बिघडणार नाहीं ना ? सरळपणें काम करितां येते कीं लबाडी शिवाय चालत नाही. हे करण्यांत मनाला लाचारी हीनता येतें किंवा हें काम तुम्हाला आवडते असें देखील कोणी विचारलें नाहीं. प्रत्येकाचा प्रश्न एकच 'परवडतें कां ?' शेतकरी मित्र मात्र वेगळ्या प्रकारचे प्रश्न विचारीत 'जमीन कशी आहे ? कोणत्या पिकाला उपयोगी आहे ? विहीरीला पाणी आहे काय ?' असले प्रश्न शेतकऱ्यांचे असत. माझ्या श्रीमंत मित्रांचा मात्र 'परवडते कां' हाच अगदी रोख ठोक प्रश्न. हा प्रश्न

विचारणारांचा एक वेगळाच वर्ग आहे आणि त्यांची विचारसरणीहि बहुजनांच्यासारखी नाहीं. हे मला दिसून आलें. त्यानीं हा प्रश्न विचारला म्हणून माझी त्यांच्या विरुद्ध तक्रार नाहीं, कारण हा प्रश्न एक प्रकारे अत्यंत महत्वाचा आहे यांत संशय नाहीं. म्हणून त्याच्याकडे माझें लक्ष वेधल्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. कारण हें काम हातीं घेतांना या प्रश्नाबद्दल कदाचित् मी पूर्ण विचार केलेला नसावा.

मग त्यांच्या प्रश्नांचा अर्थ काय ? 'परवडते काय?' या वाक्याचा निश्चित अर्थ काय ? मी जास्त चौकशी केली तेव्हां या वाक्याचा खालील निष्कर्ष निघाला. 'तुमच्या उद्योगांतून तुम्हाला जें उत्पन्न मिळेल त्यांतून मजूरांचा पगार व त्या कामांत लागलेल्या मालाची किंमत वजा केल्यानंतर जी शिल्लक उरेल ती, तुमच्या भांडवलाच्या पाच सहा टक्के तरी आहे कीं नाहीं ? इतका फायदा पडत असेल तर तें काम करणें परवडणारें आहे. नसेल तर नाहीं. या प्रमाणांत किंवा त्याहून ज्यास्त फायदा उरत असेल तर तें काम लक्ष घालण्यासारखें आहे हें उघड आहे. उरत नसेल तर त्यांत पडण्यासारखें काम नाहीं आणि शक्य तितक्या लौकर तें सोडलें पाहिजे. हा स्पष्ट आणि निश्चित अर्थ मला समजला तेव्हां मला समाधान वाटलें. पण तें क्षणिकच ठरलें. कारण माझा शेतीचा उद्योग आणखी कांहीं दिवस चालविल्यावर पुनः माझ्या मनांत गोंधळ उडू लागला. माझे डोकें असें जरा विचित्र, लोक-विलक्षणच आहे. कारण

'परवडतें कां ?' याचा निश्चित अर्थ मला समजला असें वाटत होते पण त्याबद्दल आतां खात्री वाटेनाशी झाली आहे.

माझ्या भांडवलावर फक्त एक टक्का फायदा उरला तरी तें सोडावें असें मला वाटत नव्हतें ही माझी अडचण होती. कारण मला वाटलें कीं या उद्योगापासून मला आनंद, समाधान वाटत आहे. माझ्याबरोबर काम करणारे मजूरहि सुखी आहेत. तेथल्या स्वच्छ उघड्या दवेंत वावरणारी मुलेंहि चांगलीं निरोगी वाढत आहेत. आम्ही तेथें कोबी, सफरचंद या सारख्या चोख उपयुक्त वस्तू उत्पन्न करीत आहोंत. आणि या कामांत फक्त एक टक्का फायदा उरत असला व त्यामुळें माझी राहणी साधी आणि कमी खर्चाची स्वस्ताईची ठेवावी लागत असली तरी चालेल पण याच्या उलट दुसऱ्या एखाद्या कामांत सदा कटकटी, तंटेबखेडे झटापटी चालू आहेत. मजूरांच्याकडून पिळून काम करून घेतलें जात आहे त्यामुळे, त्यांची तोंडें दुर्मुखलेलीं दिसत आहेत, लोकांना हानिकारक अशा, तंबाखूसारख्या वस्तू उत्पन्न केल्या जात आहेत व त्या विकताना जास्त पैसे मिळावे म्हणून भेसळ करून विकली जात आहे आणि अशा कामांत मला दहा टक्के फायदा पडला तरी मला पहिलाच उद्योग अधिक पसंत होता एवढेंच काय मला शक्य असेल तर पहिल्यासारखें जीवन मिळवण्याकरितां एक टक्काहि न उरतां मलाच कांहीं द्यावें लागलें तरी चालेल असें मला वाटत होतें.

अर्थशास्त्रदृष्टया हें अगदी चुकीचें मूर्खपणाचें आहे असें तज्ञ मला सांगणार हें मला ठाऊक होते व त्यामुळें त्यांच्या पुढें

सांगायला मला संकोच वाटत होता. पण त्याला माझा नाइलाज होता. अर्थशास्त्राचा अभिप्राय खालील प्रमाणें पडला असता. माझ्या भांडवलावरील व्याजाकडे मी जर दुर्लक्ष करीन, व्याजाची परवा करणार नाहीं तर आर्थिक समतोल बिघडेल; भांडवलाच्या नैसर्गिक मेळांत गडबड, बिघाड होईल, निदान पांच टक्के तरी व्याज येणें ही उद्योगाच्या स्थैर्याची निशाणी आहे. यामुळें माझ्या स्वतःच्या हिताचा समाजाच्या हिताशी मेळ बसेल. पांच टक्के व्याज पडणें ही जणू ईश्वरी योजनाच आहे. जो माल बनविण्यांत मला एक टक्काहि उरत नाहीं, तोच माल फ्रान्समधून आणून येथें विकण्यांत जर दहा टक्के उरत असतील तर हा उद्योग करण्यांत मी श्रमाचा अपव्यय करीत आहे. आणि असा अपव्यय थांबवणेंच योग्य असे कांहीसें त्यांचें म्हणणें असणार. पण या कामीं मला जो थोडासाच अनुभव आहे तेवढ्यावरून देखील मला ताबडतोब दिसून आलें कीं, फ्रान्समधून हा माल आणण्याचे कामी जो दहा टक्के फायदा उरतो त्यांचे कारण म्हणजे तेथील मजूर विशेष कुशल आहेत हें नसून तेथल्या कारखानदारांची मजुराना विशेष पिळून काढण्याची शक्ति, त्यांचा छळ करण्याची कुशलता त्यामुळे तेथल्या मजुरांची विशेष दैन्यावस्था हें त्याचें प्रधान कारण आहे, हें उघड आहे. आणि मी माझा उद्योग परवडत नाहीं म्हणून बंद करीन तर फ्रान्समधल्या मजुरांच्या शोषणाला उत्तेजन दिल्यासारखे होईल. आणि जगामधे दुसऱ्या कोठे हा उद्योग चालू असेल तेथल्या दुष्ट माणसाच्या हातातलें मी बाहुलें होईन. यामुळें त्यांचा फायदा वाढेल एवढेंच नव्हे तर त्यामुळे यांच्यापेक्षांहि उलटचा काळजाच्या माणसाना हें

उदाहरण पाहून त्यांच्याशी चढाओढ करण्याची बुद्धी होऊन ते त्यापेक्षा आपला माल स्वस्त करूं लागतील अर्थात् हें करण्यांत त्याच्या मजुरांना अधिकच पिळलें जाईल अशी दुष्ट परंपरा सुरू होईल. दुसरें मला असेंहि दिसून आलें कीं मी जर माझा उद्योग बंद करीन तर माझ्या कामकरी मित्राना मला काढून टाकण्याची पाळी येईल. मग त्यांना दुसरे कोठें काम मिळेल कीं नाहीं याची शंकाच. शिवाय माझ्या अंगांत धंदेवाल्याचें कौशल्य नसल्यामुळें माझ्या मजुराशी माझे संबंध प्रेमाचे झाले, त्याला मुकावें लागेल. त्यांना आपल्या पायरीप्रमाणें वागवायचें मला साधलें नाहीं. दुसरे धंदेवाले मला असाहि दोष देऊं शकतील की यानें मजुराना डोक्यावर चढवून ठेवलें आहे पण त्याला माझा इलाज नव्हता.

असा माझ्या मनांत धोटाळा उडाला होता. तें गुंतागुतीचे गहन अर्थशास्त्र आपल्याला कांहीं समजायचें नाहीं याची मला खात्री होती. आणि जे तज्ज्ञ अर्थशास्त्रज्ञ म्हणवले जातात त्यानाहि त्यातला बराच भाग कळत नाहीं अशीहि एक कल्पना माझ्या मनांत दडून बसली आहे. अशा स्थितींत माझें काम माझ्या पद्धतीनें करीत या जगांतला एक लहानसा कोपरा तरी निर्मळ राखायचा प्रयत्न करीत राहणें बरें नव्हे कां असें मला वाटलें. स्वच्छ निर्भेळ खाद्य पदार्थ उत्पन्न करायचा प्रयत्न करणें. प्रामाणिक कामाला उत्तेजन देणें, कामक-याच्या आरोग्याला जपणें, त्याना व्यवस्थित व नियमित कामाच्या संवयी लावणें, समाजाला उपयुक्त व हितकर आहेत अशाच फक्त वस्तू निर्माण करणें

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 2/१६४ वि:
क्रमांक १३०५ नों दि


अशींच कामें मला शक्य आहे, तोपर्यंत वरील राहणें आणि मग त्यांत पैशाचा काय तोटा येईल तो सोसायला तयार रहाणें हेच योग्य असें मी ठरविलें. मी एकटयानें एवढें करून काय होणार असें कोणी म्हणतील पण गडद अंधारांत ती एक मिणमिणती पणती तरी होईलच. आणि मला कोणी समानधर्मी मिळाले तर अशा अनेक पणत्या लागतील आणि त्या सर्व मिळून आपणा सर्वांना पुढील मार्ग स्वच्छ दिसण्याइतका प्रकाश पडूं लागेल. तज्ज्ञ या पद्धतीला 'अशास्त्रीय' अडाणी मध्य युगीन असा शेरा मारतील असें करणें म्हणजे उलटयाबाजूनें सुरवात करण्यासारखें आहे असें म्हणतील. पण मी वर म्हल्याप्रमाणें हें अर्थशास्त्र आपल्याला कधी तरी समजूं लागेल अशी मला मुळीच आशा नव्हती व 'ज्ञानलवदुर्विदग्धता' ही त्यापेक्षां वाईट म्हणून या शास्त्राच्या वाटेला जायचें नाहीं असें मी ठरविलें. 'देवाच्या राज्याचा शोध करा आणि त्याच्याच न्यायानें म्हणजे सदाचरणानें वागायचा प्रथम प्रयत्न करा .म्हणजे ऐहिक वस्तू तुम्हाला सहज साध्य होतील.' असें बायबलमध्यें म्हटलें आहे. पुराणांत सांगायला हें ठीक आहे पण व्यवहारांत कोणाला पटण्यासारखें आहे का ? बुद्धीला, विवेकाला पटेल का ? हें विधान युक्तीला, वस्तुस्थितीला किती सोडून आहे हे उघड दिसण्यासारखें होते. पण माझ्या मनांत त्यावर जी श्रद्धा उत्पन्न झाली होती ती कांहीं ढळेना.

कारण सर्वसाधारण लोकांचा व्यवहार चालतो त्यापद्धतीनेंच काम सुरूं करण्याचा मी प्रयत्न करून पाहिला पण सुरवातीलाच गाडी चिखलांत रुतून बसली. मी माझ्या भांडवलावर नफा किती घ्यावा आणि मजुराना मजुरी किती द्यावी यांचा कांहीं केल्या हिशेब बसवितां येईना. कारण फायदा जास्ती मिळ-

वायचा म्हणजे तितक्या प्रमाणांत कामकऱ्याना मजुरी कमी दिली पाहिजे. सध्या चालू असलेले दर द्यायचे म्हटले तर ते एकीकडे नाडलेल्या निराश लोकांचा भरणा आणि दुसरीकडे त्यांना पिळून काढायला जितके मिळेल तितके पिळण्याची बुद्धी, यांच्या संयोगानें ते ठरले आहेत हे मला माहीत असतांना हें तत्व माझ्या व्यवहाराला लावायला माझे मन कांहीं तयार होईना. चालू दरापेक्षा जास्त मजुरी दिली तर मला कांहींच फायदा मिळण्यासारखा नव्हता म्हणून माझ्या श्रीमंत मित्रानी – त्यांत कांहीं अर्थशास्त्राचे प्राध्यापकहि आहेत – माझा उद्योग रसातळास जाणार म्हणून लागलीच भविष्य वर्तवून टाकलें असते. बरे चालू दरांपेक्षा कमी मजुरी दिली तर माझ्या सदसद्बुद्धीची सारखी टोचणी सहन करावी लागली असती. अगदी डोके भणभणू लागेपर्यंत मी याच्यावर पुष्कळ विचार केला पण या चक्रव्यूहांतून बाहेर पडण्याचा कांहींच मार्ग मला दिसून येईना.

पण समजा कीं हा मजुरीचा प्रश्न समाधानकारकपणें सुटला आणि तरीहि सुदैवानें माझ्या उद्योगांत भरपूर फायदा उरूं लागला. पण हा उरलेला फायदा मी माझ्या स्वतःच्या खासगी उपयोगाला लावण्याचा हक्क मला आहे का याबद्दल माझ्या मनांत अंदेशा येऊं लागला. या उद्योगांत मी जे श्रम करीत होतो त्याबद्दलची योग्य मजुरी आणि मी देखरेख करीत होतो त्याबद्दल कांहीं मेहनताना घेतल्यानंतर भांडवलावरचें व्याज म्हणून कांहीं अधिक श्रम न करितां जर कांहीं वेगळी रक्कम घेऊं लागलों तर माझ्या इतर सहकाऱ्यांपेक्षा माझी सांपत्तिक स्थिती अधिक चांगली होईल. माझ्या अर्थशास्त्रज्ञ मित्रानीं असें करणें अगदीं योग्य आहे.

ईश्वरी योज असा निवाडा दिला, तरी या कृत्या-
बद्दल माझ्या मन एक चुटपुट, मळमळ लागून राहिली होती
ती कांहीं दूर हो मी असें जास्त पैसे घेणें म्हणजे मजुरांना
तितकी मजुरी कमी दिली असें होईल या जाणीवेनें मला त्याच्या-
पुढें उजळ माथ्यानें जाण्यास संकोच उत्पन्न होईल व एकंदरींत
आमचे जे आतां प्रेमाचे संबंध आहेत त्यांत बिघाड उत्पन्न होईल.

चैनींत आणि आळसांत दिवस घालविणारा एक मोठा वर्ग बनवला जाण्याचा विचित्र चमत्कार ह्या फायदा गिळंकृत करण्याच्या पद्धतीमुळेंच घडून आला आहे ही गोष्टहि माझ्या दृष्टीआड होईना. या वर्गातले लोक पिढयानपिढया असे निरोद्योगी वागत असल्यामुळें ते इतके दुबळे होऊन गेले आहेत कीं त्याच्या हातून कांहीं काम होणेंच नाहीं कीं चाकोरीच्या बाहेरचा योग्य विचारहि त्यांच्या मनांत येऊं शकत नाहीं. आणि या आळसामुळे ते सदा दुर्मुखलेले, कंटाळलेले आणि निराश झालेले असतात. मनोरंजन एवढाच काय तो पांढरपेशाना उद्योग उरतो व तोच काय तो प्रतिष्ठित समजला जातो. सध्याचे कला, व वाङमय, यांच्या मनोरंजनांकरितां यांचा हा कंटाळवाणा वेळ घालविण्याकरितां निर्माण होतात त्यामुळें तीहि निर्जीव असतात.

एवढा विचार केल्यावर मात्र मला त्यांच्या 'परवडतें काय ?' किंवा 'फायदा काय ?' या प्रश्नाचा खरा अर्थ स्पष्ट समजून येऊं लागला. आमच्या काव्यशास्त्र विनोदाचा नाचरंग अखंड चालण्याकरितां मजुरांचे शोषण आम्हांला या प्रमाणें नेहमी करितां येईल काय? हा 'फायदा काय' या प्रश्नाचा अर्थ. पोषाख करून वेडेवाकडया रितीनें अखंड नाचणारे आणि नेहमी असाच फायदा मिळत राहून आमची ही चैन अशीच चालेल ना ? अशीं

एकमेकास पृच्छा करणाऱ्या क्षुब्ध प्राण्यांसमकऱ्यांना माझ्या समोरून जात आहे असा मला भास झाला. हचे म्हट..शा अनैसर्गिक अयोग्य आहे अशी अंधूक जाणीव त्यांच्या दुसऱ्यांच्यावर दिसत होती शिवाय ही चैन फार दिवस चालणार नाहीं अशीहि दुश्चिन्हे त्यांना दिसत असावी असें वाटल्यावरून मी अधिकच उत्सुकतेनें पाहूं लागलो तोंच ज्या समाजांत फायदा उकळणें, पैसा मिळवणें हेंच जीविताचें एकमेव ध्येय नाहीं आणि वस्तूंची निर्मितीहि केवळ फायद्यांकरितांच होत नसून वापरणाराला उपयुक्त व समाधान देईल अशाच तऱ्हेनें वस्तू बनवल्या जाव्या. या तत्वावर काम करण्यांत 'फायदा' अर्थात् आत्महित अधिक आहे. अशीच लोकांची प्रत्यक्ष खात्री झाली असून प्रत्येकजण परोपकाराकरितां झटत असल्यामुळें सर्व इतर वस्तूंची सुबत्ता झाली आहे आणि या पृथ्वीवर जणू स्वर्गच उतरला आहे असा दुसरा देखावा मला दिसूं लागला. या समाजांत 'प्रतिष्ठितपणाची' किंवा पांढरपेशेपणाची मात्र वाण होती. कोणीच फायदा उकळत नसल्यामुळें भट्टीला कपडा देऊन तो पांढरा शुभ्र करण्याकरितां कोणाजवळ असा सुटा पैसाच नव्हता म्हणून लोकांना कडक इस्त्रीची कॉलर घालणें परवडेना म्हणून त्यांनी कॉलरच वापरायची सोडून दिली होती.

ज्या अगदीं उत्सुकतेनें हा एकच प्रश्न जेथें विचारला जातो तो समाज नामशेष होण्याचें तें चिन्ह असें मला वाटलें. प्रतिष्ठितपणाला हा मरणांतिक टोला आहे. आणि त्याच्या मृत्यूबरोबरच एक नवीन समाजरचना, एक नवें जीवन त्याच्या रक्षेतून अंकुरित होत आहे असें मला दिसलें. या नवजीवनांत 'फायदा काय ?' हा प्रश्नच विचारला जाणार नाहीं. आणि विचारला गेलाच तर [illegible] आत्महित आहे ना ? या नवीन अर्थानें विचारला जाईल.

REFBK-0008513

REFBK-0008513